

आक्रोश लाडक्या बहिणींचा....
विशेष लेख
PII


# पंढरी संचार

pandharisanchar.com

RNI-MAH-MAR/1499/2000

• पंढरपूर • सोमवार, ९ डिसेंबर २०२४
• किंमत ₹ ४ • पाने : ८

NO PAIDNEWS

• वर्ष २९ • अंक - १९९




आम. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी केलेला संकल्प पूर्ण करण्यासाठी....
PIII

## ईव्हीएम हटाव बाबतची चळवळ सुरू ठेवून
# न्यायालयीन लढा देणे महत्त्वाचे- शरद पवार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठं यश मिळालं. त्यानंतर महाविकास आघाडीकडून ईव्हीएमवर आक्षेप घेत राज्यभर आंदोलन करण्यात येत आहे. अशातच सोलापूरमधील, माळशिरसमधील, मारकडवाडी येथील ग्रामस्थांनी ईव्हीएमवर आक्षेप घेत बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, याला प्रशासनाकडून विरोध करण्यात आला. या घटनेनंतर आज (8 डिसेंबर) राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) अध्यक्ष शरद पवार मारकडवाडीत आले होते.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार म्हणाले, "निवडणूक पद्धतीत बदल करणं गरजेच आहे. देशात सध्या मारकडवाडी गावाची चर्चा सुरू आहे. ईव्हीएम मतदानातील आकडेवारी





ग्रामस्थांचा आक्षेप आहे. गावकऱ्यांना त्यांच्या गावात जमावबंदी लागू केली आहे. काही निकालांवर संशय व्यक्त केला जात आहे. अमेरिकेत बॅलेट पेपरवर मतदान होते. आपल्याकडं का नाही? म्हातारी मेल्याचं दुःख नाही, काळ सोकावतो. मारकडवाडीनं बदल करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. येथे आम्हाला राजकारण आणायचे नाही. येथील लोकांच्या मनातील शंकानिरसन दूर करायचे आहे. निवडणूक आयोगाबाबत संशय दूर करायचा आहे. ग्रामस्थांनी बॅलेट मतदानासाठी ठराव करावा, हा ठराव राज्य सरकारला पाठवावा".

मुख्यमंत्र्यांनी मारकटवाडीत येऊन लोकांच्या शंकेचं निरसन करावे असे आवाहन शरद पवार यांनी ग्रामस्थांना संबोधित करताना आवाहन केलं.

देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार हे चुकीचे वागत आहे, असे म्हटलं होते. त्यावर शरद पवार म्हणाले, " लोकांना भेटणे चुकीचे आहे का? "मुख्यमंत्र्यांनी येथील नागरिकांशी संवाद साधावा. त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे," असे शरद पवार यांनी म्हटले.

ईव्हीएम हटाव चळवळ सुरू ठेवणे गरजेचं आहे. त्याच पद्धतीनं न्यायालयीन लढा देणेही महत्वाचे आहे. सदरचा लढा देण्यासाठी मी तुमच्याबरोबर आहे. मतदारसंघातील संपूर्ण तालुक्यातून ईव्हीएम हटाव, पुढील निवडणुका या बॅलेट पेपरवरती घेण्यात यावे अशा पद्धतीचे ठराव करून ते ठराव आमदार जानकर यांच्याकडे द्यावेत. या आंदोलनाविषयी मी संसदेमध्येही आवाज उठवणार आहे," अशी ग्वाही खासदार पवार यांनी ग्रामस्थांना दिली. तसेच या आंदोलनाविषयी पंतप्रधान आणि केंद्रीय निवडणूक आयोग यांच्याबरोबर ही चर्चा करणार असल्याचे पवार यांनी सांगितले.

यावेळी बोलत असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) आमदार उत्तम जानकर म्हणाले की, "लाडक्या बहिणींच्या दोन-चार हजार मतांचा परिणाम झाला नाही असं नाही, पण एवढा मोठा परिणाम होऊ शकत नाही. बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्याच्या अटीवर मी राजीनामा देऊ शकतो. देशातील एक निवडणूक » पान 3 वर

## » At a Glance

### साळुंखे-पाटील यांनी पुन्हा पक्षात यावे



**सांगोला :** माजी आमदार दीपक साळुंखे-पाटील यांनी जनतेच्या आग्रहाखातर विधानसभेची निवडणूक लढविली. जिल्हाध्यक्ष म्हणून काम करत असताना त्यांनी सर्व घटकांना एकत्रित घेऊन काम केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने पक्षसंघटनेला त्यांची गरज आहे. त्यामुळे त्यांनी पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात यावे आणि त्यांच्याकडे जिल्हाध्यक्षपद देण्याकामी जिल्ह्यातील सर्व सेलचे पदाधिकारी व कार्यकर्ते आग्रही आहेत, असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सहकार विभागाचे प्रदेश कार्याध्यक्ष राजेंद्र हजारे यांनी सांगितले.

### प्रवासादरम्यान महिलेचे 90 हजारांचे दागिने लंपास



**सोलापूर :** लहान बाळाला अंगाला झोंबा झोंबी करायला सांगून महिलेच्या पर्समधील 90 हजार रुपये किमतीची 10 ग्रॅम सोन्याची अंगठी व 5 ग्रॅम बोरमाळ लंपास केली. या प्रकरणी दोन अज्ञात महिलांवर फौजदार चावडी पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. 3 डिसेंबर रोजी दुपारी 2. 25 ते 2. 55 वाजण्याच्या दरम्यान मंगळवार बाजार ते बाळीवेस दरम्यान रिक्षातून प्रवास करताना ही घटना घडली. याबाबत सावित्री मल्लिकार्जुन दिंडवार ( वय 50, रा. शास्त्रीनगर उत्तर सदर बझार ) यांनी फिर्याद दिली आहे. प्रवासादरम्यान दोन अज्ञात महिलांनी लक्ष विचलित करून ही चोरी केली.

### बाळे परिसरात घरफोडी; दोन लाखांचे दागिने चोरी



**सोलापूर :** बाळे येथील गुरुकृपा नगरातील बंद घराचा कडी कोयंडा उचकटून चोरट्यांनी कपाटातील 2 लाख 6 हजार 200 रुपये किमतीचे दागिने चोरून नेले. शिवदास हिरगप्पा हरवाळकर (वय 56 रा. गुरुकृपा नगर बाळे ) हे घराला कुलूप लावून भाचीच्या साखरपुड्यासाठी पुणे येथे गेले होते. या दरम्यान चोरट्याने घरात प्रवेश केला. कपाटातील ड्रॉवरच्या चोर कप्प्यात ठेवलेले 90 हजारांचे मंगळसूत्र, 30 हजारांची अंगठी, 15 हजारांची बोरमाळ, 15 हजारांचे कानातील टॉप्स, 50 हजारांची रोख रक्कम, दागिने असे एकूण 2 लाख 6 हजार 200 रुपये किमतीचे दागिने चोरून नेले.

### 273 वाहनचालकांनी भरला दंड

**सोलापूर :** वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून सुसाट वाहने चालवून आकारलेल्या दंडाचा भरणा न करणाऱ्या 450 जणांविरुद्ध न्यायालयाकडून वॉरंट बजावण्यात आले आहे. त्यापैकी 273 जणांनी शनिवार पर्यंत दंड भरून अटकेची कारवाई टाळली आहे. 14 डिसेंबर रोजी होणाऱ्या लोक अदालतीपूर्वी दंड भरून कारवाई टाळावी असे आवाहन वाहतूक शाखेकडून करण्यात आले आहे. अजूनही शहरात वाहतुक शाखेच्या पोलिसांची कारवाई सुरु असून दंडात आणखी वाढ होण्यार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# नजर चुकवून सात लाख पन्नास हजार रुपयाची रक्कम लंपास

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** एका व्यापाऱ्याने एचडीएफसी बँकेतून सात लाख पन्नास हजार रुपये रक्कम काढली. ही रक्कम घेऊन ते दुचाकी वर बसत असताना अज्ञात चार व्यक्तीने तुमचे पाचशे रुपये खाली पडले आहेत असे सांगून त्यांची नजर चुकवून सात लाख 50 हजार रुपयाची रक्कम लंपास केली. या घटनेमुळे व्यापाऱ्यात खळबळ उडाली आहे. चोरट्यांनी बँकेवर करडी नजर ठेवली असल्याचे दिसून येत आहे. या घटनेची शहर पोलीस ठाण्यातून मिळालेली माहिती अशी की नवनाथ



बाबर यांनी शनिवारी सकाळी 11 वाजता एचडीएफसी बँकेतून सात लाख 50 हजार रुपयाची रक्कम काढली. ही रक्कम घेऊन ते आपल्या दुचाकी वर बसले असता अज्ञात चार तरुण आले. त्यांनी साहेब तुमचे पैसे खाली पडले आहेत असे सांगितले. यामुळे बाबर पैसे घेत असताना चोरट्यांनी त्यांनी दुचाकी वर ठेवलेली सात लाख 50 हजार रुपयाची बॅग लंपास केली. ही बॅग घेऊन चोरटे दुचाकी वरून पसार झाले. यानंतर बाबर यांनी शहर पोलीस ठाण्यात जाऊन अज्ञात चार चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत. या घटनेमुळे पंढरपुरातील व्यापाऱ्यात भीतीचे वातावरण पसरले आहे.

सदर चोरटे ज्या मार्गांनी गेले त्या मार्गावरील सर्व सीसीटीव्ही कॅमेरे पोलिसांकडून तपासण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले.



## उज्जैनच्या धर्तीवर पंढरपुरात माऊली कॉरिडॉर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** काशी आणि उज्जैनच्या धरतीवर पंढरपूरचा विकास करावा. यासाठी पंढरपुरात आता माऊली कॉरिडॉर करण्याचे प्रस्तावित आहे. देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट म्हणून पंढरपूरच्या कॉरीडॉरकडे पाहिले जाते. मात्र हा कॉरिडॉर करत असताना स्थानिकांच्या घरांची पडझड होत असल्याने याला विरोध होतोय. फडणवीस मुख्यमंत्री झाल्याने आता पुन्हा एकदा कॉरिडॉरच्या चर्चेला पंढरपुरात सुरुवात झाली. यामुळे नागरिकांत उलट-सुलट चर्चा होत असताना दिसत आहे.

## राज्यात 167 शेतकऱ्यांच्या आत्महत्या
# कर्जमाफी जाहीर करण्याची मागणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** राज्यातील विदर्भात नापीक कर्जबाजारीपणा दुष्काळ अशा विविध कारणे 60 दिवसात 167 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यामुळे शासनाने कर्जमाफी जाहीर करावी अशी मागणी शेतकरी संघटनांकडून होत आहे. शेतकरी बँका, पतसंस्था, खाजगी सावकार यांच्याकडून कर्ज घेऊन पिकांची लागवड करतो. मात्र नैसर्गिक आपत्तीमुळे शेतातील पिकांचे नुकसान होत आहे. मात्र वसुलीचा तगादा लावला जात आहे. यामुळे शेतकरी मनस्ताप सहन करावा लागत आहे. वसुलीच्या तगाद्यामुळे शेतकरी टोकाचे पाऊल



उचलत आहे. विदर्भात 60 दिवसात 167 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यामुळे नवीन शासनाने शेतकऱ्यांची कर्जमाफी जाहीर करावी अशी मागणी होत आहे. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात महायुती शासनाने शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात येईल असे जाहीर केले होते.यामुळे आता शासनाने कर्जमाफी जाहीर करावी अशी मागणी शेतकरी संघटनातून होत आहे.

# बारामती लोकसभेची निवडणूक बॅलेट पेपरवर घ्यावी - मा.आ.सातपुते

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** बारामती लोकसभा मतदार



संघातून खासदार सुप्रिया सुळे विजयी झाल्या आहेत. खासदार शरद पवार यांनी सुप्रिया सुळे यांचा राजीनामा घेऊन या मतदार संघात बॅलेट पेपरवर पुन्हा मतदान घ्यावे. दूध का दूध व पाणी का पाणी होऊन जाईल. आमदार उत्तम जानकर यांचा बळी घेऊ नये असे माजी आ.राम सातपुते यांनी सांगितले.

माळशिरस विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडीने उत्तम जानकर यांना तर महायुतीने माजी आ. राम सातपुते यांना उमेदवारी दिली होती. दोघांमध्ये अटीतटीची लढत होऊन यात उत्तम जानकर विजय झाले. आमदार जानकर यांचा बालेकिल्ला असलेल्या मारकडवाडी येथे आमदार जानकर यांना कमी मते मिळाली. यामुळे ग्रामस्थांनी मतदान यंत्रावर संशय व्यक्त केला व पुन्हा बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची तयारी केली. मात्र या प्रशासनाने परवानगी दिली नाही. पोलिसांनी जमावबंदी आदेश लागू केला. मारकडवाडीचा प्रकार संपूर्ण राज्यभर पसरला. यामुळे शरद पवार यांनी ग्रामस्थांचे कौतुक करण्यासाठी रविवारी मारकडवाडी भेट दिली. यावेळी त्यांनी मतदान यंत्रावर संशय व्यक्त केला. यानंतर पत्रकारांची बोलताना, माजी आ. राम सातपुते म्हणाले, खा. शरद पवार यांचा मतदान यंत्रावर संशय असला तर त्यांनी बारामती लोकसभा मतदार संघातील खासदार सुप्रिया सुळे यांच्याकडून राजीनामा घ्यावा व पुन्हा बॅलेट पेपरवर मतदान घ्यावे. यानंतर दूध का दूध व पाणी का पाणी होऊन जाईल. माळशिरस विधानसभा मतदार संघाचे आ. उत्तम जानकर यांचा बळी देऊ नये असे सांगितले.

## ईव्हीएममधील फेरफाराबाबत लवकरच गौप्यस्फोट करू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** सत्तेच्या जोरावर सर्व



यंत्रणा हाताशी धरून ईव्हीएमच्या मदतीने देशाला हुकूमशाहीकडे नेणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या विरोधात येत्या काळात देशभरात काँग्रेस आंदोलन करणार आहे. तसेच लवकरच ईव्हीएम यंत्रणेतील फेरफाराबाबत मोठा गौप्यस्फोट करू, असा दावा काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांनी पत्रकार परिषदेत केला. मारकडवाडीला भेट दिल्यानंतर लोंढे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. खा. शरद पवार यांनी मारकरवाडीस भेट दिली असल्यामुळे सर्वत्र याबाबत चर्चा होताना दिसत आहे.

## भेट...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**मुंबई :** मोहोळ विधानसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नवनिर्वाचित आमदार राजु खरे यांनी आमदारकीची शपथ घेतल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन चर्चा केली. याप्रसंगी विविध मान्यवर उपस्थित होते.

## ऊसाला पहिला हप्ता ३७०० रुपये देण्यात यावा
# साखर कारखानदार व शेतकरी संघटनेच्या बैठकीकडे लक्ष

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** चालू गाळप हंगामातील ऊसाला पहिली उचल 3700 देण्यात यावी. अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिला आहे. यामुळे साखर कारखानदार व शेतकरी संघटना यांच्यात तोडगा काढण्यासाठी साखर आयुक्त कृणाल खेमनार यांच्या आदेशानुसार आज सोमवारी 9 डिसेंबर रोजी कोल्हापूर येथे साखर कारखानदार व स्वाभिमानी शेतकरी संघटना यांच्यात बैठक होणार आहे. या बैठकीत कोणता निर्णय होणार याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. 25 ऑक्टोबर रोजी जयसिंगपूर येथे स्वाभिमानी शेतकरी संघटने वतीने ऊस परिषद घेण्यात आली. या परिषदेमध्ये सन 2023-24 सालात गाळप झालेल्या ऊसाला २०० रुपये अंतिम हप्ता व चालू गाळप हंगामात ऊसाला पहिली उचल 3700 देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली होती. मात्र कारखानदाराने याकडे दुर्लक्ष केले. यामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक झाली असून त्यांनी आठ दिवसात साखर कारखानदारांनी पहिली उचल जाहीर करावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला आहे.



साखर कारखानदार व शेतकरी संघटना यांच्यामध्ये तोडगा काढण्यासाठी साखर आयुक्त कृणाल खेमनार यांनी आज सोमवारी बैठक घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार आज सोमवारी कोल्हापूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक होणार आहे. या बैठकीत कोणता निर्णय होणार याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.


या बैठकीनंतर ऊस आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्यात येणार असल्याचेही शेतकरी संघटनेच्यावतीने सांगण्यात आले.

पंढरी संचार

## प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजना!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** प्रधानमंत्री शेतकरी



सन्मान निधी योजना (पीएम-किसान) अंतर्गत शेतकऱ्यांना दरवर्षी 6,000 रुपये दिले जातात. योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी नोंदणी केली पाहिजे. आवश्यक कागदपत्रे: आधार कार्ड, बँक पासबुक, जमीनीची मालकी कागदपत्रे, आणि इतर संबंधित माहिती. लाभाची स्थिती तपासण्यासाठी www.pmkisan.gov.in वेबसाइटला भेट द्या किंवा पीएम किसान ॲप डाउनलोड करा. मदतीसाठी हेल्प डेस्कशी संपर्क करा असे आवाहन करण्यात आले आहे.

# सावंत यांना आरोग्यमंत्री पद मिळावे विठ्ठलास साकडे



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** एकीकडे मंत्री मंडळ विस्ताराच्या चर्चाच सुरू असताना. दुसरीकडे पंढरपुरात शिवसेनेच्या महिला आघाडी यांच्या वतीने विठ्ठलाची महा आरती करत तानाजी सावंत यांना पुन्हा आरोग्यमंत्री करा. असे साकडे विठ्ठलास घालण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने वारकरी संप्रदायाच्या वतीने भजन - कीर्तन करत. आमच्या भावाला आरोग्यमंत्री करा. अशा आशयाचे फलक महिलांच्या हातात दिसून आले. त्यामुळे विस्तारापूर्विच तानाजी सावंत यांच्या आरोग्यमंत्री पदासाठी शिवसैनिक आणि महिला आग्रही असताना दिसत आहे.

**दयानंद पाटोळे यांचे दु :खद निधन**



देवीच्या गण्याचे गायक एकतारी भजनाचे गायक कलेच्या माध्यमातून महाराष्ट्रभर प्रसिद्ध असलेल्या दयानंद पाटोळे यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले निधनासमयी त्याचे वय ६३ होते त्याचा पश्चात पत्नी व मुलगी एक मुलगा ३ असा परिवार आहे

## श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ एज्युकेशन कमलापूर येथे

# समाजसेवा शिबिर उद्घाटन संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**सांगोला :** श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ एज्युकेशन कमलापूर येथे दिनांक 8 डिसेंबर 2024 रोजी सकाळी दहा वाजता बीएड प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांचे समाजसेवा शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक माधुरी सूर्यवंशी हिने केले या समाजसेवा शिबिराचे प्रमुख उद्घाटक सिंहगड संस्थेचे सहसचिव मा. संजय नवले सर हे होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रा. डॉ. शिवाजी जगताप हे होते सदर उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे यांनी समाजसेवा ही का केली पाहिजे समाजसेवेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकी व स्वच्छता तसेच समाजासाठी काहीतरी आपण देणे लागतो या दृष्टिकोनातून ही समाजसेवा करणं गरजेचं आहे याविषयी विचार व्यक्त केले तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.डॉ. शिवाजी जगताप यांनी आपल्या मनोगतातून समाजसेवा ही विद्यार्थ्यांनी शालेय स्तरापासून केली पाहिजे जेणेकरून आपल्या अंगी समाजाविषयी असणारी आपुलकी स्वच्छतेविषयी असणारी जाणीव आणि समाजामध्ये एक चांगलं नेतृत्व निर्माण करता यावं या दृष्टिकोनातून समाजसेवा झाली पाहिजे याविषयी विचार व्यक्त केले. सदर कार्यक्रमाला बीएड प्रथम व द्वितीय वर्षातील सर्व प्रशिक्षणार्थी हजर होते तसेच या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक हजर होते या उद्घाटनानंतर सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामधील स्वच्छता करून समाजासाठी एक आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सदर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आकाश अनुसे या प्रशिक्षणार्थ्यांनी केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधुरी बिले हिने केले सदर कार्यक्रम समाजसेवा प्रमुख मा. डॉ कांगडे एस पी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी यशस्वीरित्या पूर्ण केला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## ट्रॅक्टर अंगावरून गेल्याने दोघींचा जागीच मृत्यू




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** ट्रॅक्टरचा अचानक गिअर पडून दोघा बहीनीच्या अंगावरून गेल्याने दोघींचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात 7 डिसेंबर रोजी सायंकाळी सव्वा सहा वाजता आष्टे ता मोहोळ शिवारात घडला. नीता राजू राठोड वय 20 व आतीश्री राजू राठोड वय 4 अशी मृतांची नावे आहेत. ट्रॅक्टर क्रमांक एम एच 24 डी 7147 हा बांधावर चालू स्थितीत चालक सुनील गुलाब राठोड यांनी उभा केला होता. त्यावेळी निता राठोड ही अतिश्री ला कडेवर घेऊन ट्रॅक्टर मध्ये चढत असताना, ट्रॅक्टरचा अचानक गिअर पडल्याने ट्रॅक्टर पुढे गेला व तो निता व अतीश्री यांच्या अंगावरून गेला. याबाबत पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## Selected

### पुरावे मिळाल्यानंतर न्यायालयीन लढाई लढू



**माळशिरस :** मारकडवाडी सारखी भारतात पहिल्यांदाच मतदान यंत्रावर शका घेत आहे अशी शंका अनेक गावांच्या मनात आहे. याबाबत ठोस पुरावे मिळाल्यावर आपण न्यायालयीन लढाई लढू. असा दावा राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केला आहे. शरद पवार यांनी या गावांमध्ये आज कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

### पवारांच्या दौऱ्याआधीच राष्ट्रवादीचे जानकर व भाजपचे सातपुते समर्थकांमध्ये वाद



**सोलापूर :** माळशिरसच्या मारकडवाडीत आज ज्येष्ठ नेते शरद पवारांच्या दौऱ्याआधीच राष्ट्रवादीचे आमदार उत्तम जानकर व भाजपचे माजी आमदार राम सातपुते समर्थकांमध्ये वाद झाला. गावकऱ्यांनी ईव्हीएमवर शंका घेत बॅलेट पेपरवर मतदानाची मागणी केली होती, पण प्रशासनाने तो प्रयत्न रोखला. गावात लावलेल्या "EVM हटाव, देश बचाव" फलकावरून वाद उफाळला. सातपुते समर्थकांनी फलक काढण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे वादावादी झाली. सातपुते समर्थकांनी विकासकामांचा दावा करत पुन्हा निवडणुकीचं आव्हान दिलं.

### भाजप कार्यकर्त्यांनी हुसकावून लावले



**माळशिरस :** शरद पवार मारकड वाडीत आल्यावर देवेंद्र फडणवीस आणि राम सातपुते यांचे बोर्ड झाकण्याचा प्रयत्न झाला. हा प्रयत्न भाजपा कार्यकर्त्यांनी हुसकावून लावला. मारकाड वाडी गावातील शंभर लोक देखील शरद पवारांसमोर नाहीत. हे लोक इतर गावातील आहेत असा दावा भाजपने केला.

## यश..

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**माळशिरस :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे अंतर्गत शेळवे येथील कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी महाविद्यालयात विभागीय ॲथलेटिक्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये पानीव तालुका माळशिरस येथील श्रीराम शिक्षण संस्थेचे कॉलेज ऑफ फार्मसी पानीव मधील विजयी विद्यार्थी.

## विभागीय ॲथलेटिक्स स्पर्धेत पानीवच्या विद्यार्थ्यांचे यश....

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे अंतर्गत शेळवे येथील कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी महाविद्यालयात विभागीय ॲथलेटिक्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये पानीव तालुका माळशिरस येथील श्रीराम शिक्षण संस्थेचे कॉलेज ऑफ फार्मसी पानीव मधील अंतिम वर्ष बी.फार्मसीचा विद्यार्थी चि. अभिषेक पाटील याने भालाफेक या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला आणि अंतिम वर्ष बी फार्मसीची कु. पुनम इंगळे या विद्यार्थिनीने 400 मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम व 100 मीटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला.

विजेत्या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक सिताराम काळे, प्रिया माने देशमुख आणि अक्षता बाबर यांचे मार्गदर्शन लाभले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. प्रकाश पाटील मार्गदर्शक मा.सौ. श्रीलेखा पाटील, उपाध्यक्ष करण पाटील, सचिव ॲड. अभिषेक पाटील,विशेष कार्यकारी अधिकारी दिनेश शिंदे, प्राचार्य डॉ. स्वप्निल फडे, विभाग प्रमुख पंकज खुसपे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

यशस्वी विद्यार्थी यांचे अभिनंदन करुन त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी प्रशालेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# आक्रोश लाडक्या बहिणींचा....



प्रासंगिक

बाळासाहेब बडवे

(संपादक)

मो.नं.7028543453

आजच नवीन विधानसभेच्या आमदारांचा शपथविधी पार पडला. प्रशासकीय पातळीवरची संविधानाने आखून दिलेली विधानसभेच्या कामकाजाची प्रक्रिया सुरु झाली आणि मंत्र्यांचे रिपोर्ट कार्ड आजच समोर आले. या प्रक्रिया चालू असतानाच खान्देशातील नंदूरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यात असलोद या ग्रामीण भागातील गावात तिथे दारुने उच्छाद जो मांडलेला आहे. त्याच्या तीव्र विरोधात त्या गावातील लाडक्या बहिणींनी हा उच्छाद संपवून टाकण्यासाठी लोकशाही पद्धतीचा आधार घेऊन आज सकाळी ९ वाजल्यापासून दुपारपर्यंत मतदानाची प्रक्रिया पूर्ण केली.

या प्रक्रियेसाठी १२६० लाडक्या भगिनींनी मतदान करणार आहेत आणि आपला आक्रोश, आपल्या भावना आणि त्यावर तातडीने परिणामकारक उपाय योजना झाल्या पाहिजेत यासाठी आक्रोश केला आहे.

भारताच्या राजकीय इतिहासात महात्मा गांधी यांच्यासारखा दारुबंदीला विरोध करणारा नेता आजही कुठेही झालेला दिसत नाही. महात्मा गांधींनी सौराष्ट्र, पोरबंदर, दिल्लीत आणि ग्रामीण भागात हिंडताना दारुमुळे कौटुंबिक वातावरणावर विशेषतः मायभगिनीवर आणि १० वर्षाच्या आत असलेल्या बालकांवर काय परिणाम होऊ शकतो. यावर बारकाईने अभ्यास केला आणि ब्रिटीशांचे राज्य असले तरी दारुबंदीच्या विरोधात प्रचंड प्रमाणात आंदोलने केली. गांधीजींनी ग्रामीण भागात माता-भगिनी किंवा नागरिकांशी संपर्क साधताना दारुच्या संदर्भात जे दुष्परिणामाच्या विचाराचे जागरण केले. त्याचा परिणामही माता आणि भगीनी यांच्यावर झाला आणि कित्येक कुटुंबातील मातांनी गांधींचा उपदेश आदेश माणून आपल्या घरातील दारुड्यांचा बंदोबस्त केला. पुढे स्वातंत्र्य मिळाले. दारुबंदीवर अनेक राज्यात मंत्रिमंडळातील एका मंत्र्यांची नेमणूक केली. आता अलिकडे उत्पादन शुल्क खाते अनेक राज्यात दिसते. या उत्पादन शुल्क खात्यातून विविध कंपन्यांच्या दारुची विक्री करण्यासाठी, ग्राहकांची सोय व्हावी म्हणून रितसर परवाना (लायसन्स) देऊन सोय केली जाते. दुर्दैवाने कांही ग्रामीण भागात विशेषतः महाराष्ट्रात अशा अ.धिकृत दुकानात चोरुन हातभट्टीची दारुही विकली जाते हे वास्तव नाकारता येणार नाही.



नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील असलोद गावात दारुबंदीसाठी मतदान घेण्यात आली. मतदानासाठी महिलांनी लावलेली रांग.



नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी उत्पादन शुल्क खात्याच्या अधिकाऱ्यांकडून पोलिस खात्याचे सहकार्य घेऊन महाराष्ट्रात अनेक ठिकाणी हातभट्टीच्या भट्ट्या उध्वस्त केल्या. शेकडो, हजारो लिटर दारुची पिपं रिकामी करण्यात आली. त्यांच्यावर गुन्हे दाखल केले. तेवढ्यापुरता परिणाम जाणवला. पुढे कांही दिवसांतच जागा आणि वेळ बदलून हातभट्ट्या सुरु झाल्या. हे महाराष्ट्राचे दुर्दैव मानावे लागेल. दारुमुळे शेकडो संसार उध्वस्त होताना आपण पाहतो. घरात बाप दारु पिऊन येतो हे पाहून डोकं शांत करण्यासाठी मुलगाही बाहेरुन दारु पिऊन येतो. आज कित्येक कुटुंबात महिलासुद्धा दारु घेतल्याचे चित्र दिसून येते. १२६० महिलांनी शहादा तालुक्यातील असलोद येथे दारुबंदी पूर्णपणे अंमलात यावा यासाठी जो लोकशाहीचा मार्ग अवलंबिला गेला.

या प्रक्रियेची यंत्रणा महसूल खात्याच्या तहसीलदारांनी पार पाडली. त्यामुळे इथे इव्हीएम च्या खोट्या आरोपाचाही संबंध येऊ शकत नाही. मतदान पत्रिकेच्या माध्यमातून या लाडक्या बहिणींनी आपला आक्रोश व्यक्त केलेला आहे. असलोद येथे जी परिस्थिती आहे ती महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात आणि प्रत्येक गावात आहे. भ्रष्टाचार नावाच्या भुतानी या संसार उध्वस्त करणाऱ्या दारु व्यवसायाला आजपर्यंत कुठे कुठे प्रोत्साहन मिळत गेले आहे हे वास्तवही नाकारता येणार नाही. दिवसभर काबाडकष्ट करुन ग्रामीण भागातला कष्टकरी शेतकरी किंवा कामगार घरी जातो पण जाताना गावातल्या दुकानातूनकिंवा गुप्त ठिकाणी चाललेल्या भट्टीतून दोन घोट पोटात टाकून जातो. यातूनच पत्नीवर, लेकरावर तो हात उगारतो आणि धुंदी थोडीशी आवाक्याच्या बाहेर गेली की अंथरुणावर पडतो. सकाळी उठतो घरच्या मातेनी बांधून ठेवलेली शिदोरी घेतो आणि शेतीवर पुन्हा मजूरीला जातो. याचा परिणाम अत्यंत विपरित आणि भयानक होतो. दारुच्या व्यसनानी अलिकडे तरुणाईत एक वेगळा उत्साह दिसून येतो. कोणत्याही शहराच्या गावाबाहेर पडलं की अनेक धाबे असतात. त्या धाब्यावर आतल्या बाजूला मदिरापानाची सोय केली जाते. तिचा आस्वाद घ्यायचा आणि तेथून निघून जायचे. रेड पडली तर सावरासावर करायची. कुणाचेतरी खिसे भरायचे आणि पुन्हा धंद्याला लागायचे हा नित्याचा विषय बनला आणि हा गंभीर आहे. हा सामाजिक जीवन उध्वस्त करणारा आहे, माता -भगिनींचे स्वास्थ बिघडविणारा आहे आणि यातूनच सामाजीक बांधिलकीची दुर्दशा ठरणारा आहे.

आजच महाराष्ट्राचे नवे मंत्रिमंडळ देवाभाऊंच्या नेर्तृत्वाखाली कार्यरत होताना दिसते. गेल्या अडीच वर्षाच्या कालखंडात देवाभाऊ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या शासनाने अनेक योजनाव्दारे मायभगिनींना आधार दिलेला आहे. भुकेल्या पोटाला दोन घास मिळतील अशी व्यवस्था केलेली आहे. त्यामुळे महिला भगिनींच्या संसाराला हातभार लागलेला दिसतो. तरुणांच्या हाताला कामही मिळू लागले आहेत. शेतकऱ्यांना मिळणाऱ्या सवलती त्यांच्या पदरात पडू लागल्या आहेत. पुढील पाच वर्षे वेगळ्या आशानी, अपेक्षींनी भारावून गेलेली दिसतात. निवडणूकीच्या रणांगणावर मिळविलेला विजय हा ऐतिहासिक आहे. आणि याच पद्धतीने महायुतीच्या सरकारने जाणीवपूर्वक लक्ष देऊन दारुबंदीच्या संदर्भात कठोर निर्णय घेऊन त्यावर परिणामकारक उपाय योजना कराव्यात अशी सरकारच्या लाडक्या बहिणीची अपेक्षा आहे.

पंढरपूरसारख्या तिर्थक्षेत्राच्या गावाच्या याबाबतच्या वेदना कांही वेगळ्या नाहीत. पंढरपूरपासून मराठवाड्यात जाणाऱ्या रस्त्यावर शेटफळपर्यंत किती धाबे आहेत, किती ठिकाणी दारु मिळते, कोल्हापूर रस्त्याला पंढरपूर तालुक्याच्या हद्दीपर्यंत अनेक लहान मोठे हॉटेल आणि धाबे आहेत. संध्याकाळी तर येथे दारुड्यांची गर्दीच गर्दी उसळलेली दिसते. पुणे रस्त्याची परिस्थिती कांही वेगळी नाही. शहराच्या पश्चिम भागात अनेक उपनगरातून झोपडीतून दिवसा ढवळ्या दारु विक्री केली जाते. शहरातील अनेक बिअरबारमध्ये दारु पिण्याचा परवाना नसताना दारु मिळू शकते. हे तिर्थक्षेत्राच्या पवित्र ठिकाणचे वास्तव आहे. कुणाच्या आशीर्वादानं हे धंदे चालतात कोण-कोण यात खिसे भरुन घेते, कुणाचे वशिले इथपर्यंत पोहोचतात आणि दारुच्या धंद्यावर जो मस्तवाल झाला त्याच्या व्यवसायाने किती जणांची घरे उध्वस्त झाली या विचार पाच वर्षाच्या स्थिर सरकारने ठेवून यावर अत्यंत परिणामकारक उपाय योजना गरजेची आहे. ज्या बहिणीच्या ताटात तुम्ही भाऊबीजेचं दान टाकलं त्याच बहिणीच्या संसाराचं वाटोळे होणार नाही याची दक्षता जर घेतली तर पुढील प्रत्येक निवडणुकीत याच बहिणी तुम्हाला आनंदाने ओवाळतील आणि प्रेमाने तुमची दृष्ट काढून तुमच्या प्रती आनंद व्यक्त करतील. कारण हा आक्रोश एकट्या 'असलोद' गावचा नाही तर महाराष्ट्रातल्या ग्रामीण भागातील गावाचं हे वास्तव आहे.

**सोलापूर :** जमीयत ए अहले हदिस यांच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही सोलापुरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यंदाच्या वर्षी अतहर ब्लड बँकेच्या सहकार्याने जमीयत ए अहले हदिस यांच्यावतिने आयोजित रक्तदान शिबिरात सुमारे 250 हुन अधिक जणांनी सहभाग नोंदविला. या शिबिराची माहिती संघटनेचे सचिव मौलाना ताहेर बेग मोहम्मदी यांनी दिली. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन सोलापुर जमीअत अहले हदीसचे अध्यक्ष मुख्तार हुमनाबादकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अब्दुल हमीद शेख, अस्लम हमदुले, वसीम शेख आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## आम. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी केलेला
# संकल्प पूर्ण करण्यासाठी तालुक्यातून प्रथम चिंचोली गावातून प्रारंभ

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**सांगोला :** सांगोला विधानसभा निवडणुकीत ज्या गावामधून जेवढं मताधिक्य तेवढी झाडे लावण्याचा संकल्प शेतकरी कामगार पक्षाचे आम. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी केला आहे. त्यानुसार चिंचोली गावातून 1हजार 30 मतांचे लीड मिळाले म्हणून सरपंच दत्तात्रय नाना बेहेरे यांच्या पुढाकाराने व शेतकरी कामगार पक्षाच्या पदाधिकारी नेते मंडळींच्या सहकार्याने वृक्ष लागवडीचा उपक्रम हाती घेतला आहे. तालुक्यातील पहिल्याच चिंचोली गावातून विधानसभा निवडणुकीच्या संकल्पपूर्तीची सुरुवात करण्यात येत आहे. शुक्रवारी ग्रामपंचायत परिसर, खंडोबा मंदिर, स्मशानभूमी व रस्त्याच्या दुतर्फे बाजूने एकाच दिवसात 100 वृक्ष रोपांची लागवड करण्यात आली आहे. उर्वरित वृक्ष रोपांची लागवड लवकरच करणार असल्याचेही सरपंच दत्तात्रय बेहेरे यांनी सांगितले आहे.

सांगोला तालुक्यातील चिंचोली येथे वृक्ष लागवड कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी वनपरिक्षेत्र अधिकारी तुकाराम जाधवर, वनरक्षक जी.बी. व्हरकटे, सरपंच दत्तात्रय बेहेरे, पोलीस पाटील हरिदास पाटील, विकास सेवा सोसायटीचे चेअरमन दादासाहेब आनंदा माने, माजी सरपंच लक्ष्मण बेहेरे, मारुती बेहरे, संजय शेजाळ, संतोष बेहरे यासह गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

"काय झाडी काय डोंगर काय हाटील" फेम माजी आमदार शहाजीबापू पाटील यांच्या डायलॉगमुळे सांगोला तालुका मोठा फेमस झाला. यानिमित्ताने सांगोला विधानसभा निवडणुकीत डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी माजी आमदार शहाजीबापू पाटील यांचा पराभव केला आणि निवडणूक निकालानंतर तालुक्यात झाडी झुडपे वाढवीत म्हणून आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांनी ज्या गावात जेवढे मताधिक्य तेवढी झाडे लावण्याचा संकल्प केला. आणि त्या संकल्पनेनुसार शुभेच्छा देण्यासाठी आलेल्या प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्यांना वृक्षरोप भेट देण्याचे आवाहन केले होते. तालुक्यातील विविध पक्षाचे पदाधिकारी नेतेमंडळी यांनी शुभेच्छा देण्यासाठी वृक्षरोप भेट दिले. व गाव पातळीवर आपल्या गावातून जेवढे मताधिक्य तेवढी झाडे लावण्यासाठी पदाधिकारी प्रयत्नशील आहेत.

आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख यांच्या संकल्प पूर्तीसाठी सर्वप्रथम चिंचोली गावातून सुरुवात झाली आहे. लोकनियुक्त सरपंच दत्तात्रय बेहेरे यांनी पुढाकार घेतला असून गावातून १ हजार ३० मताचे लीड दिले आहे तर 1 हजार 30 झाड लावून आमदार साहेबांची संकल्पपूर्ती करणार असल्याचे सांगण्यात आले आहे. त्या अनुषंगाने वृक्ष लागवड मोहीम सुरू करण्यात आले असून, गावामध्ये इतर ठिकाणी उर्वरित वृक्ष लागवड करणार असल्याचेही सरपंच दत्तात्रय बेहरे यांनी सांगितले आहे.

## शेतकऱ्यांचा पैसा येईपर्यंत लढणार - राऊत



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी :** सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या एका रुपयातही मी मिंदा नाही. सभासदांनी काबाड कष्टाने कमावलेली पुंजी बँकेत ठेवली. तत्कालीन संचालकांनी नियमबाह्य व बेकायदेशीर कर्जवाटप केल्याने कर्जे थकली, एनपीए वाढला. सभासदांना अनेक वर्षांपासून लाभांश मिळत नाही, नव्या शेतकऱ्यांना पीककर्ज मिळत नाही. बँकेतील हा कारभार २०११ मध्ये मीच बाहेर काढला. त्यासाठी मंत्रालय, उच्च न्यायालयापर्यंत संघर्ष केला. शेतकऱ्यांचा पैसा वसूल होईपर्यंत कोणालाही सोडणार नाही? अशी ठाम भूमिका याचिकाकर्ते तथा माजी आमदार राऊत यांनी व्यक्त केली.

» पान १ वरुन

## न्यायालयीन लढा देणं महत्त्वाचं....

बॅलेटवर घेऊ शकत नाही? तुम्ही गडचिरोलीत निवडणुका घेता, काश्मीरमध्ये निवडणूक घेता, तर मग एक पोटनिवडणूक घ्यायला तुम्हाला अडचण काय?", असा संतप्त सवालही जानकर यांनी केला.
मारकडवाडी येथील ग्रामस्थांनी ईव्हीएमवर आक्षेप घेत 3 डिसेंबर रोजी बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्याचं जाहीर केलं होतं. यासाठी ग्रामस्थांकडून संपूर्ण तयारी करण्यात आली होती. मात्र, त्यानंतर प्रशासनाकडून गावात जमावबंदीचे आदेश लागू करण्यात आले. गावात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनानं जमावबंदी लागू केली. तसंच जमावबंदीमध्ये मतदान झालं तर लोकांवर गुन्हे दाखल होतील, असा इशारा पोलिसांकडून देण्यात आला. त्यामुळं अखेर ही मतदान प्रक्रिया रद्द करण्यात आली.
संसदेमध्ये स्वत: शरद पवार मारकटवाडीतील मतदान आंदोलनाचा प्रश्न उपस्थित करणार असल्यानं सरकार काय भूमिका घेणार? याकडे संपूर्ण देशाचं लक्ष लागले आहे.

» Selected

## शिवसैनिकाच्या गाडीची तोडफोड



**सांगोला :** माजी आमदार शहाजी पाटील यांचा पुतण्या शिवसेना युवा सेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख सागर पाटील यांच्या गाडीची अज्ञात व्यक्तीने काच फोडली. याच्या निषेधार्थ शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन जाहीर निषेध केला. कृत्य करणाऱ्या व्यक्तीला तत्काळ अटक करा; अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल, असे निवेदन पोलिस निरीक्षक भीमराव खंणदाळे यांना दिले.

## कारवाई झालेल्या पदाधिकाऱ्यांची पुन्हा भाजपमध्ये फेरनिवड



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** विधानसभा निवडणुकीत पक्षविरोधी काम केल्यामुळे भाजपचे जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे, जिल्हा उपाध्यक्ष अफसर जाधव, तालुकाध्यक्ष रामभाऊ ढाणे, शहराध्यक्ष जगदीश अग्रवाल, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष अमोल पवार यांच्यावर पक्ष श्रेष्टींकडून कारवाई झाली होती. मात्र त्यांची जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांची फेर निवड केली आहे. भाजपाचे प्रदेशाशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशाने या फेरनिवडी झाल्या आहेत. कारवाई झालेल्या करमाळ्यातील सर्व पदाधिकाऱ्यांना पुन्हा भाजपात सक्रिय होण्याचे आदेश आले आहेत.
विधानसभेच्या निवडणुकीत कांही पदाधिकाऱ्यांनी पक्षविरोधी काम केल्यामुळे त्यांच्यावर पक्षश्रेष्ठींनी कारवाई केली होती. परंतु आता ज्यांच्यावर कारवाई करण्यात आली होती. त्यांना पुन्हा पक्षात समाविष्ट करुन घेण्यात आले आहे.

## शेतकऱ्यांत जनजागृती

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**माळशिरस :** माळीनगर येथे कृषी कन्यांकडून शेती विषयक ॲपबाबत माहिती दिली. याप्रसंगी अनेक शेतकरी व मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरेही देण्यात आली.

## सांगोल्यात २१ हजार ४८५ हेक्टरवर ज्वारीची पेरणी



**सांगोला :** सांगोला तालुक्यात रब्बी हंगामात ३९ हजार ३४१ हेक्टर क्षेत्रावर ८८. ४६ टक्के पेरण्या झाल्या आहेत. तालुक्यात २१ हजार ४८५ हेक्टरवर ५७. ३३ टक्के क्षेत्रावर रब्बी ज्वारीची सर्वाधिक पेरणी झाली आहे. रब्बी पिकाच्या पेरणीत ज्वारीच्या पेरण्या ५० टक्क्यांवर झाल्या आहेत. गहू व हरभरा पिकांच्या पेरणी क्षेत्रात आणखी वाढ होणार असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी दीपाली जाधव यांनी दिली.




## बिटस्तरीय शालेय स्पर्धेत तरंगफळ शाळेचे घवघवीत यश



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** 6/12/2024 रोजी बिटस्तरीय शालेय स्पर्धा सुळेवाडी येथे पार पडल्या.
यामध्ये जि. प. प्रा. शाळा तरंगफळ ने घवघवीत यश संपादन केले. 1. कबड्डी (मुली लहान गट)-प्रथम क्रमांक(तालुका स्तरीय स्पर्धेसाठी निवड) 2. धावणे 200मीटर (लहान गट मुले )-तुशांत विलास कांबळे -प्रथम क्रमांक(तालुका स्तरीय स्पर्धेसाठी निवड)3. धावणे 200मीटर (मोठा गट मुली)-रिद्धी मुगुटराव पाटील-प्रथम क्रमांक(तालुका स्तरीय स्पर्धेसाठी निवड) 4. धावणे -100मीटर(मोठा गट मुली)-रिद्धी मुगुटराव पाटील-द्वितीय क्रमांक. सर्व विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे तरंगफळ चे सरपंच श्री नारायण तात्या तरंगे माजी सरपंच सुजित तरंगे दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष गोरख जानकर ग्राम शिक्षण समितीचे अध्यक्ष विकास महानवर उपसरपंच विक्रम बागाव यांचे सह ग्रामस्थ व ग्रामपंचायतच्या व ग्राम शिक्षण समिती यांच्या वतीने हार्दिक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मैंदर्गीत कारमध्ये सापडले देशी पिस्तूल



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** मैंदर्गी येथील मादनहिप्परगा चौकात कर्नाटक पासिंगच्या एका कारमध्ये गावठी देशी पिस्तुलासह एकाला पोलिसांनी जेरबंद केले. दुसरा संशयित फरार झाला. पिस्तूल व कार पोलिसांनी जप्त केली असून, अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाण्यात याबाबतचा गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत पोलिस नाईक जगदीश नेमिनाथ राठोड (वय ३८, नेमणूक अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाणे) यांनी फिर्याद दिली.

## महाराष्ट्रातील 50 हजार शिक्षकांच्या पगारात 20% वाढ



**सोलापूर :** महाराष्ट्रातील 50 हजार शिक्षकांच्या पगारात 20% वाढ आता लागू होणार आहे. पात्र शाळा आणि शिक्षकांची माहिती 10 डिसेंबरपर्यंत मागवली आहे. जून 2024 पासून पूर्वलक्षी प्रभावाने वेतनवाढ लागू होणार असून 40%, 60%, 80% अशा टप्प्यांत वेतन सुधारणा होईल. शिक्षकांच्या सततच्या आंदोलनांमुळे व आमदार किशोर दराडे यांच्या प्रयत्नांमुळे निर्णय गतीमान झाला. या वाढीमुळे आर्थिक अडचणीत असलेल्या शिक्षकांना दिलासा मिळेल. मार्च 2025 पर्यंत वाढीव वेतन अंमलात येईल.




## महाराष्ट्रात मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री होताच
# माझी लाडकी बहिण योजनेसाठी अर्जाची मुदत वाढवण्याची मागणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** राज्य सरकारला सत्तेच्या खुर्चीपर्यंत पोहोचवणाऱ्या 'लाडकी बहीण' योजनेचा अर्ज भरण्याची शेवटची तारीख उलटून गेली आहे. अर्ज भरण्याची शेवटची तारीख 15 ऑक्टोबर होती.
आता 'लाडकी बहीण' योजनेसाठी अर्ज करता येत नाही. या योजनेपासून अनेक महिला वंचित असून त्यांना अर्ज करण्यासाठी आणखी मुदत वाढवून देण्याची मागणी महिलावर्गातून होत आहे.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतल्यानंतर 'लाडकी बहीण' योजना सुरू ठेवणार असल्याचे सांगितले आहे. 'लाडकी बहीण' योजनेत आतापर्यंत ज्या महिलांनी अर्ज भरले नाहीत त्यांना आता अर्ज भरता येणार का याबाबत अनिश्चितता आहे.
यामुळे अनेक महिलांनी 'लाडकी बहीण' योजनेसाठी पुन्हा अर्ज करण्यास सवलत देण्याची मागणी करण्यात येते आहे. राज्यात साधारण सव्वादोन कोटी



महिला या योजनेचा लाभ घेत आहेत.
सोलापूर जिल्ह्यात या योजनेंतर्गत 10 लाख 52 हजार 392 महिला आहेत. जिल्ह्यासाठी पुढील वाढीव हप्ता 215 कोटी 33 लाख 25 हजारांचा आहे. योजनेंतर्गत आता काही निकष असणार आहेत.

# स्वागतार्ह निर्णय

फेब्रुवारी २०२५ मध्ये दिल्ली विधानसभेची निवडणूक होईल. यावेळी स्वबळावर लढण्याची घोषणा काँग्रेसने केली आहे. तोच कित्ता आम आदमी पार्टीनेही गिरवला आहे. कागदावर मतांचे गणित करून हिशेब मांडणाऱ्यांना काँग्रेस आणि आप या दोन्ही पक्षांचा निर्णय चुकीचा वाटू शकतो. त्यांच्या मतांची विभागणी होईल असा तर्क त्याकरता दिला जाऊ शकतो. पण कोणा एकाला संपूर्ण वर्चस्व बहाल करून दिल्लीचे भले होणार नाही आणि झालेही नाही. त्यामुळे ज्यांना उपलब्ध दोन सक्षम पर्याय नको असतील तर त्यांना जुना, अनुभवलेला पर्यायही उपलब्ध आहे व त्याचा ते वापर करू शकतात. त्यामुळे दोन्ही पक्षांच्या या निर्णयाचे स्वागतच करायला हवे. स्वबळावर लढण्याचा निर्णय आत्मघातकी कसा हे स्पष्ट करण्यासाठी अलीकडेच झालेल्या हरियाणा विधानसभा निवडणुकीचे उदाहरण दिले जाते आहे. या राज्यातील ९० पैकी ४८ जागा जिंकून भारतीय जनता पार्टीने हॅट्ट्रिक केली. काँग्रेसलाही ३७ जागा मिळाल्या. आम आदमी पार्टीला खाते उघडता आले नाही. काँग्रेस नेते राहुल गांधी यांना आपशी आघाडी करायची होती. प्रदेश काँग्रेसच्या नेत्यांना मात्र स्वबळावर सत्ता काबीज करण्याचा विश्वास असल्यामुळे त्यांनी राहुल यांच्या इच्छेपुढे मान तुकवली नाही. असेही नुकताच आलेला लोकसभेचा निकालही त्यांच्या पथ्यावर पडला. प्रचंड हवा निर्माण करूनही आपने हरियाणात एकच जागा जिंकली. विधानसभेत भाजपला ३९.९४ तर काँग्रेसला ३९.०९ टक्के मते मिळाली. आपला १.७९ टक्के मतदारांनी पसंती दिली. भाजप आणि काँग्रेसला मिळालेल्या मतांमध्ये अत्यंत सूक्ष्म अंतर आहे मात्र तरीही भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले. त्यामुळेच दावा करणाऱ्यांचे म्हणणे असे आहे की जर काँग्रेस आणि आप एकत्र लढले असते, तर काँग्रेस सत्तेत राहिली असती आणि भाजपची स्थिती बिकट झाली असती. हे गणित मांडणाऱ्यांचा तर्क बिनतोड असला, तरी त्यात मतदारांना गृहीत धरण्याची जी सवय आहे तीही डोकावते. काँग्रेस आणि आप एकत्र आले असते तर कदाचित दोन्ही पक्षांना आता जी मते मिळाली आहेत तीही त्यांना मिळाली नसती आणि ती अन्य किंवा भाजपकडे गेली असती याकडे त्यांचे दुर्लक्ष होते. निवडणूक रणनीतितज्ज्ञ प्रशांत किशोर यांनी बिहारसंदर्भात हाच तर्क मांडला आहे. या राज्यात राष्ट्रीय जनता दल नको, पुन्हा जंगलराज नको म्हणून लोक राष्ट्रीय लोकशाही आघाडीला नाईलाजाने मतदान करत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. ते अन्य कोणाच्या पचनी पडले असेल नसेल मात्र आपच्या अरविंद केजरीवाल यांना समजले. सहा महिन्यांपूर्वी त्यांनी दिल्लीत काँग्रेससोबत लोकसभा एकत्रितपणे लढवली. दोन्ही पक्षांची मतांची बेरीज केली तर भाजपला ते सहज पराभूत करू शकले असते. प्रत्यक्षात त्यांना खातेही उघडता आले नाही. राजधानीतील सर्व ७ जागा भाजपने जिंकल्या. आता विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला सोबत घेतले, तर काँग्रेसला मतदारांच्या असलेल्या विरोधाचा फटका आपल्याला बसू शकतो आणि त्यामुळे मते भाजपकडे जाऊ शकतात याची केजरीवालांना कल्पना असल्यामुळे इंडिया आघाडीत राहूनही पहिला दगड कोणी मारायचा याचा काँग्रेस आणि आप दोघेही वाट पाहात होते. केजरीवाल हिशेबी राजकारणी आहेत, त्यांचा फायदा त्यांनी बघितला. तथापि, काँग्रेसने मात्र या संधीचा फायदा घेण्याची गरज आहे त्याचे कारण कोणी काहीही म्हटले तरी केजरीवालांचा दिल्लीत आणि एकूणच देशातील राजकारणात उदय हा काँग्रेसच्या मुळावरच झाला आहे. यासंदर्भातील आकडेवारी अगदी बोलकी आहे. २०१३ मध्ये काँग्रेसला दिल्ली विधानसभेत जवळपास २५ टक्के मते मिळाली. नंतर २०१५ मध्ये ९.७ तर २०२० मध्ये केवळ ४.३ टक्के मते मिळाली. यातील २०१३ मध्ये काँग्रेसला ८ जागा मिळाल्या आणि नंतरच्या दोन निवडणुकांत त्यांना खातेही उघडता आले नाही. कारण त्यांचा जनाधार संपुष्टात आला होता व यातील बहुतांश लोकांनी सक्षम पर्याय म्हणून आपला स्वीकारले आणि आपने विरोधक औषधालाही शिल्लक ठेवले नाही असे यश मिळवले. काँग्रेसने जे गमावले तेच आपने कमावले. हाच प्रयोग त्यांनी हरियाणा, गुजरात, गोवा आणि पंजाबमध्येही केला. यातील प्रत्येक राज्यात काँग्रेसला फटका बसला आणि पंजाबचीही काँग्रेसच्या संदर्भात बोलायचे तर दिल्ली झाली. या राज्यातही २०२२ मध्ये आप स्पष्ट बहुमताने सत्तेवर आली. आम आदमी पार्टीशी हातमिळवणी ही चूक होती असे अलीकडेच दिल्ली काँग्रेसचे अध्यक्ष देवेंद्र यादव यांनी म्हटले आहे. तसेच चूक एकदाच होते, पुन्हा पुन्हा केली जात नाही असेही त्यांनी म्हटले आहे व यावेळी दिल्लीतील सगळ्या जागा लढण्याचा इरादा जाहीर केला. त्यांचे म्हणणे त्यांच्या श्रेष्ठींनी ऐकले आणि खरेच काँग्रेस स्वबळावर लढली तर ते काँग्रेससाठी आणि दिल्लीकरांसाठीही पोषक असणार आहे. सध्याच्या स्थितीत दिल्लीकरांनी लोकसभा भाजपला आणि विधानसभा आपला अशी विभागणी केली आहे. तथापि, गेल्या दहा वर्षांतील अनुभव पाहता या दोन्ही पक्षांनी केवळ भांडणेच केली. केजरीवालांना भाजपने काम करू दिले नाही, असा आपचा आरोप आहे, तर भाजपही केजरीवाल आणि कंपनीच्या विरोधात वेगवेगळी प्रकरणे काढून त्या पक्षाला तोडण्याचा प्रयत्न करतो आहे. अशा वातावरणात तिसरा सहमतीचे, सहअस्तित्वाचे राजकारण करणारा पक्ष उभा राहिला आणि तो स्वतंत्रपणे जाणार असला, तर मतदारांना ते हवेच असेल.

**संविधानाच्या प्रस्तावनेमध्ये धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी हे शब्द कायम राहतील, असा ऐतिहासिक निकाल सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधिश संजीव खन्ना यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने दिला आहे. १९७६ मध्ये तत्कालीन इंदिरा गांधी सरकारने ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारे हे दोन शब्द समाविष्ट केले असून ते काढून टाकण्यात यावेत अशा आशयाच्या याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या होत्या. यंदाच्या संविधान दिनाच्या दिवशी या सर्व याचिकांबाबत एकत्रित निकाल देताना धर्मनिरपेक्षता हे संविधानाचे अविभाज्य अंग आहे आणि समाजवादाचा अर्थ कल्याणकारी राज्य आहे ही बाब स्पष्ट केली. या निर्वाळ्यामुळे गेल्या चार दशकांपासून सुरू असलेला वितंडवाद थांबेल अशी अपेक्षा आहे. त्याऐवजी बदलत्या काळात धर्मनिरपेक्ष तत्वांचा अंगिकार करून भारताला एकसंघ ठेवण्यासाठी आणि सामाजिक न्यायाची, आर्थिक समानतेची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे.**

# समानतावादी निर्णय

**ॲड. प्रदीप उमाप, कायदे अभ्यासक**

भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेत १९७६ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आणीबाणीच्या दरम्यान ४२ व्या घटनादुरुस्तीद्वारे 'समाजवादी' आणि 'धर्मनिरपेक्षता' या शब्दांचा समावेश केला होता. याला आव्हान देणाऱ्या याचिकांवर अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक निकाल दिला असून हे शब्द काढून टाकण्यास नकार दिला आहे.

भारताला धर्मनिरपेक्ष देश म्हणून संबोधण्यावर गेल्या चार दशकांपासून जोरदार चर्चा होत आहे. बहुतेक उजव्या विचारसरणीचे लोक असा दावा करत आले आहेत की, हे लादलेले शब्द स्यूडो-सेक्युलॅरिझम, व्होट-बँकेचे राजकारण आणि अल्पसंख्याकांच्या तुष्टीकरणासाठी आहेत. तसेच पाश्चिमात्य राज्यघटना तयार करताना जर ख्रिस्तीबहुल देशात बायबलचा आधार घेऊन आणि इस्लामिक देशात कुराण-हदीस यांचा आधार घेऊन ती तयार केली जात असेल, तर भारतीय राज्यघटना सिद्ध करतांना ती धर्मनिरपेक्ष का? असाही सवाल उपस्थित केला गेला. वास्तविक, सरनाम्यातील धर्मनिरपक्षेतेचा अर्थ भारतात विविध धर्माचे लोक राहात असून आणि धार्मिक श्रद्धांमध्ये फरक असूनही, त्यांच्यात एकता आणि बंधुता आहे. राष्ट्र सर्व धर्मांचे समान संरक्षण करते, सर्व धर्मांप्रती तटस्थता आणि निःपक्षपातीपणा राखते आणि कोणत्याही एका धर्माला राष्ट्रीय धर्म मानत नाही. धर्मनिरपेक्षता हा नेहमीच संविधानाच्या तत्वज्ञानाचा एक भाग होता. भारतीय प्रजासत्ताकाच्या संस्थापकांनी संविधानात धर्मनिरपेक्षतेचे तत्त्वज्ञान अंतर्भूत करण्याच्या हेतूने कलम २५, २६ आणि २७ स्वीकारले. ४२ व्या दुरुस्तीने केवळ औपचारिकपणे हा शब्द घटनेत जोडला गेला. १५ नोव्हेंबर १९४८ रोजी प्रा. के.टी.शहा यांनी प्रस्तावनेत समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष हे शब्द समाविष्ट करण्याचा प्रस्ताव मांडला होता. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, राज्यांचे धोरण काय असावे, समाजाचे सामाजिक आणि आर्थिक वर्तन कसे असावे हे सर्व वेळ आणि परिस्थितीप्रमाणे लोकांनी ठरवायला हवे. ते संविधानात मांडता येणार नाही. कारण त्यामुळे लोकशाही उद्धवस्त होईल. असे असूनही या दोन शब्दांवरुन अनेकदा प्रचंड खडाजंगी झाल्याचे दिसून आले आहे. भाजपचे माजी खासदार सुब्रमण्यम स्वामी यांनीही सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकांमध्ये संविधानाच्या प्रस्तावनेतून समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष हे शब्द काढून टाकण्याची मागणी केली आली होती. २००८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने 'समाजवादी' शब्द हटवण्याची मागणी करणारी याचिका फेटाळली होती. भारताचे तत्कालीन सरन्यायाधीश केजी बालकृष्णन यांच्या नेतृत्वाखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने तेव्हा म्हटले होते की, तुम्ही कम्युनिस्टांच्या व्याख्येनुसार समाजवादाला संकुचित अर्थाने का घेता? व्यापक अर्थाने याचा अर्थ नागरिकांसाठी कल्याणकारी उपाययोजना करणे असा आहे. हा लोकशाहीचा एक पैलू आहे. त्याचा निश्चित अर्थ नसून वेगवेगळ्या वेळी त्याचे वेगवेगळे अर्थ आहेत.

न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या खंडपीठाने असे म्हटले आहे की, संविधानातील विविध तरतुदींमधील 'समानता' आणि 'बंधुता' या शब्दांकडे लक्ष देता, तेव्हा त्यांचा खरा अर्थ समजतो. तसेच, या न्यायालयाने अनेक प्रकरणांमध्ये धर्मनिरपेक्षता हा आपल्या राज्यघटनेच्या मूलभूत रचनेचा भाग आहे, हे स्पष्टपणाने सांगितल्याचेही न्यायालयाने निदर्शनास आणून दिले. राज्यघटनेच्या सरनाम्यात 'भारत हा सेक्युलर म्हणजे धर्मनिरपेक्ष आणि सोशालिस्ट म्हणजे समाजवादी' असल्याची सुधारणा आणीबाणीच्या काळात करण्यात आलेल्या ४२ व्या घटनादुरुस्तीत होती. या दोन शब्दांवरुन अनेक वर्षे भारतात राजकारण रंगल्याचे जनतेने पाहिले. या शब्दांवर आक्षेप घेणाऱ्या काही याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या होत्या. या सर्व याचिका एकत्र करुन त्यावर संविधान दिनाच्या दिवशी सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला असून या याचिका फेटाळून लावल्या आहेत. समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष हे शब्द भारतीय राज्यघटनेसाठी अत्यंत महत्त्वाचे असून त्यांचा अर्थ पाश्चात्य देशांपेक्षा वेगळा आहे, असे न्यायालयाचे मत आहे. धर्मनिरपेक्षता हा भारतीय राज्यघटनेचा पाया आहे आणि तो काढून टाकता येणार नाही, याची आठवणही न्यायालयाने करून दिली.

अधिवक्ता विष्णू शंकर जैन आणि अश्विनी उपाध्याय यांच्या नेतृत्वाखाली दाखल करण्यात आलेल्या याचिकांमध्ये असा युक्तिवाद करण्यात आला की जेव्हा संविधान बनवण्यात आले तेव्हा घटनाकारांनी सखोल विचारविनिमय करून प्रस्तावनेत समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष हे शब्द समाविष्ट न करण्याचा निर्णय घेतला होता. राज्यघटनेच्या मसुद्यावरील चर्चेचा दाखला देत संविधान बनवताना हे शब्द जोडण्याचे प्रस्ताव फेटाळण्यात आले होते, असेही याचिकाकर्त्यांनी न्यायालयाला सांगितले. परंतु न्यायालयाने हा युक्तिवाद मान्य करण्यास नकार दिला. हा नकार देताना न्या. खन्ना यांनी सांगितले की, जेव्हा राज्यघटना बनवली गेली, तेव्हा धर्मनिरपेक्षतेचा अर्थ आजच्यापेक्षा पूर्णपणे वेगळा होता. भारतातील धर्मनिरपेक्षतेची समज काळासोबत खूप बदलली आहे.

एका याचिकाकर्त्यांनी असाही दावा केला होता की २६ नोव्हेंबर १९४९ रोजी राज्यघटना स्वीकारण्यात आली असताना १९७६ मध्ये घटनादुरुस्ती करुन समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष शब्द जोडणे ही बाब असंवैधानिक ठरते. तथापि, न्यायालयाने संविधानाला 'जिवंत दस्तऐवज' मानले असून सामाजिक गरजांनुसार तो बदलत राहतो यावर भर दिला. या संपूर्ण निकालादरम्यान न्यायमूर्तींनी नोंदवलेली निरीक्षणे ही विशेष महत्त्वाची ठरली. काही याचिकाकर्त्यांनी १९८९ मध्ये लोकप्रतिनिधी कायदा १९५१ मध्ये केलेल्या दुरुस्तीलाही आव्हान दिले होते. त्यांचा युक्तिवाद असा होता की राजकीय पक्षांना नोंदणीसाठी समाजवाद आणि धर्मनिरपेक्षतेची शपथ घेण्यास भाग पाडणे हे कलम १९(१)(अ) अंतर्गत त्यांच्या भाषण स्वातंत्र्याचे उल्लंघन आहे. परंतु न्यायालयाने हा युक्तिवादही फोल ठरवला.

भारतातील धर्मनिरपेक्षतेला आकार देण्यात न्यापालिकेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. १९६२ च्या सरदार ताहेरुद्दीन सय्यदना साहिब प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे असे म्हटले आहे की संविधानातील कलम २५ आणि २६ (धर्म स्वातंत्र्य) भारतीय लोकशाहीचे धर्मनिरपेक्ष चारित्र्य अधोरेखित करतात. याचा अर्थ, भारतातील सर्व धर्मांना समान अधिकार आहेत आणि कोणताही धर्म सरकारपेक्षा मोठा नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. संविधानातील कलम २५ आणि २६ ही केवळ धार्मिक तत्त्वे आणि श्रद्धांचेच रक्षण करत नाहीत तर धर्माच्या आचरणात केल्या जाणाऱ्या क्रियाकलापांचेही संरक्षण करतात. धर्माचा अत्यावश्यक भाग कोणता आहे किंवा धार्मिक प्रथा काय आहे हे या तत्त्वांच्या आधारे ठरवले जाते. केशवानंद भारती प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने १९७३ मध्ये अत्यंत महत्त्वाचा निर्णय देताना धर्मनिरपेक्षता हा आपल्या राज्यघटनेच्या गाभ्याचा भाग असल्याचे स्पष्ट केले होते. राज्यघटनेतील ज्या गोष्टी बदलता येत नाहीत त्यामध्ये धर्मनिरपेक्षतेचाही समावेश होतो.

सर्वोच्च न्यायालयाने ताज्या निर्णयात म्हटले आहे की, संविधानाचा सरनामा वाचल्यानंतर भारतात व्यक्तीस्वातंत्र्याचे मोल किती आहे याची कल्पना येते. असे स्वातंत्र्य हिरावून घेतले जाऊ शकत नाही. आर्थिक, सामाजिक आणि राजकीय न्यायाचाही प्रस्तावनेत उल्लेख आहे. संविधानात बदल करण्याच्या संसदेच्या अधिकारालाही काही मर्यादा आहेत. १९९४ मध्ये सुप्रीम कोर्टाने एसआर बोम्मई प्रकरणात आणखी एक जबरदस्त निर्णय दिला होता. धर्मनिरपेक्षता म्हणजे सर्व धर्मांना समान वागणूक देणे, असे न्यायालयाने हा निकाल देताना म्हटले होते. तसेच 'धर्मनिरपेक्ष' हा शब्द कलम २५ ते २८ अंतर्गत दिलेल्या मूलभूत अधिकारांवर भर देणारा असल्याचे स्पष्ट केले होते. याचा अर्थ, भारतातील कोणत्याही धर्माला सरकारकडून विशेष सहकार्य मिळणार नाही. सर्व धर्म समान मानले जातील आणि प्रत्येकाला त्याच्या धर्माचे पालन करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असेल. २००२ मध्ये अरुणा रॉय प्रकरणावरील सुनावणीदरम्यानही सर्वोच्च न्यायालयाने धर्मनिरपेक्षतेचा खरा अर्थ स्पष्ट केला. सरकार कोणत्याही व्यक्तीशी त्याच्या धर्माच्या आधारावर भेदभाव करणार नाही, असे न्यायालयाने म्हटले होते. धार्मिक शिक्षण आणि धर्माचा अभ्यास यातला फरक न्यायालयाने निर्दशनास आणून दिला. न्यायालयाने म्हटले की, धर्माबद्दल वाचणे आणि लिहिणे योग्यच आहे; परंतु कोणत्याही विशिष्ट धर्माबद्दल शिक्षण देणे प्रतिबंधित आहे. याचा अर्थ, शाळांमध्ये मुलांना कोणत्याही एका धर्माबद्दल शिकवले जाऊ शकत नाही. परंतु, जर एखाद्या शाळेला सर्व धर्मांची माहिती मुलांना द्यायची असेल तर त्याला मनाई नाही. उलट यामुळे मुलांमध्ये सर्व धर्मांबद्दल आदराची भावना निर्माण होईल आणि ते धार्मिक सहिष्णुता शिकतील. ताज्या निर्णयामुळे गेल्या चार दशकांपासून सुरु असलेल्या वादावर अधिकृतरित्या पडदा पडला हे बरेच झाले. मुळात, धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद या शब्दांवरुन वितंडवाद करण्यापेक्षा धर्मनिरपेक्ष तत्वांचा अंगिकार करून भारताला एकसंघ ठेवणे ही आजची गरज आहे. त्याचप्रमाणे समाजवादाचा रुढार्थ काहीही असला तरी त्यातील सामाजिक न्यायाची, आर्थिक समानतेची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी लोकप्रतिनिधींनी, धोरणकर्त्यांनी आणि राजकीय पक्षांनी सामूहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे.




**पंचांग**

**सोमवार, दिनांक ९ डिसेंबर २०२४,** मार्गशीर्ष शु. ८/९, पूर्वा भाद्रपदा. श्री शके १९४६, विक्रम संवत् २०८१, अनलनाम संवत्सर, दक्षिणायन, हेमंत ऋतू. दुर्गाष्टमी, महाराणी ताराराणीसाहेब पुण्यतिथी, करवीर. नक्षत्र : पूर्वा भाद्रपदा, योग : सिद्धि, करण : बालव. सूर्योदय : स.०६.४२ सूर्यास्त : सायं.०५.३० वा. **राहू काळ : सकाळी : ७:३० ते ९:००**


**दिनविशेष**

▶१४८४ : अंध संतकवी सूरदास यांचे निधन. ▶१७६१ : महाराणी ताराबाई यांचे निधन. ▶१९४२ : दीनदुबळ्यांची मोफत वैद्यकीय सेवा करणारे समाजसेवक डॉ. कोटणीस स्मृतिदिन. त्यांच्या कार्याने प्रेरित होऊन व्ही. शांताराम यांनी 'डॉ. कोटणीसकी अमर कहाणी' हा चित्रपट काढला. या चित्रपटाला राष्ट्रपती पदक मिळाले आहे. ▶१९४६ : भारतीय राज्यघटना परिषदेची पहिली बैठक. ▶१९४६ : काँग्रेस पक्षाध्यक्षा सोनिया गांधी यांचा जन्म. ▶१९९३ : इंडियन मर्चंट चेंबरच्या महिला शाखेतर्फे देण्यात येणारा पहिला 'जानकीदेवी बजाज पुरस्कार' प्रसिद्ध समाजसेविका व स्त्रियांना उद्योगप्रवण करणाऱ्या महिला कार्यकर्त्या अनुताई लिमये यांना जाहिर. ▶१९९६ : ज्येष्ठ मराठी पत्रकार सुभाष किरपेकर यांचे निधन. ▶१९९७ : ज्ञानपीठ पुरस्कारविजेते कन्नड साहित्यिक डॉ. शिवराम कारंथ यांचे निधन. ▶१९९९ : पद्मभुषण सन्मानाने गौरविलेले प्रसिद्ध वीणावादक के. एस. नारायणस्वामी यांचे निधन. ▶२००३ : भारतीय चित्रसृष्टीतील महत्वपूर्ण कामगिरीबद्दल सदाबहार अभिनेते देव आनंद यांना २००२ चा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहिर.

**राशीभविष्य**

▲**मेष** : केलेल्या कामाचे यश मिळेल. ▲**वृषभ** : सुसंगती वाढेल, मजेत वेळ जाईल. ▲**मिथुन** : कामाचा कंटाळा येईल. ▲**कर्क** : मतभेद होतील.▲**सिंह** : आवडत्या व्यक्तीची भेट होईल. ▲**कन्या** : कामात दिरंगाई होईल. ▲**तुळ** : अनपेक्षित कामे होतील. ▲**वृश्चिक** : जिवलग साथीदार भेटतील. ▲**धनु** : अतिश्रम टाळा. ▲ **मकर** : प्रवासाचे बेत आखाल. ▲**कुंभ** : वसुलीस अनुकूल दिवस. ▲ **मीन** : मतभेदात समेट होईल.

**चिंतन**



परमेश्वराच्या न्यायबुद्धीवर ज्याचा विश्वास नाही तो संशयात्मा असतो. जो परमेश्वराला आपल्याजवळ अणतो त्याला पराभव कधीच होत नाही. कारण ती शक्ती म्हणजे एक वैश्विक सत्य आहे.

**– साने गुरुजी**

**व्यक्तीविशेष**

## डॉ. द्वारकानाथ कोटणीस

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात चीनमध्ये मदतीसाठी भारतातून गेलेल्या डॉक्टरांच्या पथकाचे प्रमुख डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांचा जन्म १० ऑक्टोबर १९१० रोजी सोलापूर येथे झाला. १९३६ मध्ये त्यांनी आपले वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. दुसऱ्या महायुद्धात जपानने चीनवर केलेल्या हल्ल्यात चीनच्या जखमी सैनिकांचे खूप हाल झाले. चीन सरकाच्या विनंतीवरून पं. नेहरूंनी जे पाच डॉक्टरांचे मदत पथक पाठविले, त्याचे प्रमुख होते डॉ. कोडणीस. जखमी चीनी सैनिकांच्या शुश्रूषेत त्यांनी प्रयत्यांची पराकाष्ठा केली. अतिश्रम, कुपोषण, दूषित हमवामान यामुळे त्यांची प्रकृती खालावली. त्यातच ९ डिसेंबर १९४२ रोजी त्यांचे चीनच्या भूमीवर निधन झाले. आज चीनमध्ये त्यांचे भव्य स्मारक त्यांच्या सेवाकार्याची महती सांगत उभे आहे. आतंरराष्ट्रीय बंधुत्वाच्या भावनचे प्रतीक असणाऱ्या डॉ. द्वारकानाथ कोटणीसांच्या जीवनाची कथा व्ही, शांताराम यांनी अजरामर केली. त्यांनी काढलेला डॉ. कोडणीस की अमर कहानी हा चित्रपट केवळ भारतातच नव्हे, तर जगभर गाजला.

**बोधकथा**

## सत्याचा विजय

बालमित्रांनो, कधी कधी गृहपाठाचा कंटाळा येतो म्हणून तुम्ही तो अभ्यास आईकडून किंवा मोठ्या ताईकडून करून घेतात की नाही? करून घेत नसतील तर उत्तमच आहे; पण जे कोणी अशा प्रकारे अभ्यास करून घेत असेल त्यांच्यासाठी ही कथा आहे. ही कथा आहे देशभक्त गोपाळकृष्ण गोखले यांची. ते शाळेत शिकत असताना एके दिवशी गणिताच्या शिक्षकांनी त्यांना काही उदाहरणे घरून सोडवून आणण्यासाठी दिली. गोपाळला या उदाहरणांपैकी काही गणिते सुटत नव्हती. त्यासाठी त्याने आपल्या एका मित्राची मदत घेतली आणि त्याच्याकडून ते गणित सोडवून घेतले. दुसऱ्या दिवशी शाळेत आल्यानंतर शिक्षक सर्वांच्या वह्या तपासू लागले. सर्व मुलांच्या वह्यांमध्ये ते अवघड गणित चुकलेले होते; फक्त गोपाळचेच गणित बरोबर होते. ते पाहून शिक्षकांना फार आनंद झाला आणि त्यांनी गोपाळचे खूप कौतूक केले. बक्षिस म्हणून त्याला ते काहीतरी देऊ लागले. त्यावेळी गोपाळने ते बक्षिस घेण्यास नकार दिला आणि तो रडू लागला. (पूर्वार्ध)

**जिज्ञासा**

## प्लास्टिकचा शोध

प्लास्टिक हे आज आपल्या जीवनाचे अविभाज्य घटक बनले आहे. सकाळी उठल्यानंतर ब्रशपासून प्रत्येक ठिकाणी आपण प्लॅस्टिकचा वापर करत असतो. प्लास्टिकचे विविध प्रकार आहेत पण प्लास्टिकच्या पहिल्या प्रकाराच्या शोधामागे एक गोष्ट आहे. जॉन वेस्ले हीयाट नावाच्या इंग्रज शास्त्रज्ञाला हा शोध लागला. पूर्वीच्या काळी बिलियर्ड खेळण्यासाठी लागणारा चेंडू हस्तीदंतापासून बनवला जात असे. हस्तीदंताच्या वस्तू बनवण्यासाठी हत्तींची शिकार होऊन त्यांची संख्या कमी होऊ लागली. परिणामी हस्तीदंताच्या वस्तू खूप महाग झाल्या. म्हणून बिलियर्ड खेळण्यासाठी लागणारा हस्तीदंत चेंडूही महाग झाला. म्हणूनच हस्तीदंताप्रमाणेच दुसऱ्या एखाद्या पदार्थाची गरज जाणवू लागली. यासाठी इंग्लंडमध्ये घोषणा करण्यात आली की हस्तीदंतासारखा पदार्थ जो शोधून काढेल त्याला मोठे बक्षिस दिले जाईल. बक्षिस मिळवण्यासाठी बरेच शास्त्रज्ञ कामाला लागले. त्यातीलच एक होता जॉन वेस्लेहीयाट. जॉन हा गरीब लोहाराचा मुलगा होता. गरिबीमुळे त्याला शिक्षण सोडावे लागले होते. (पूर्वार्ध)

**गणित गम्मत**

मनीष, अमित, किशन या तिघांमध्ये नेहमी चढाओढ असते. दोन दिवसांपूर्वी विज्ञान विषयाची चाचणी परीक्षा झाली. त्यामध्ये मनीष व अमित या दोघांचे मिळून गुण १११ होते. अमित आणि किशन यांच्या गुणांची बेरीज ११६ होते आणि मनीष व किशन या दोघांच्या गुणांची बेरीज १०३ होते. या तिघांपैकी एकाला ५४ गुण मिळालेले होते. तर प्रत्येकाला किती गुण मिळाले ते सांगा पाहू?

**उत्तर : मनीषला ४९ गुण**
**अमितला ६२ गुण**
**किशनला ५४ गुण**

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ५२३**


| | | | |
|---|---|---|---|
| | | 2 | |
| 4 | | | |
| | | | 2 |
| | 1 | | |

**क्रमांक ५२२ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 3 | 1 | 4 |
| 1 | 4 | 3 | 2 |
| 3 | 2 | 4 | 1 |
| 4 | 1 | 2 | 3 |

**हास्यविनोद**

रेल्वेतील एका प्रवाशानं बबनरावांचं 'किती वाजले आहेत' हे विचारून डोकं खाल्लं होतं. ते काहीच उत्तर देत नव्हते. तरीही तो माणूस सारखा प्रश्न विचारत होता. अखेर बबनराव म्हणाले, 'अहो माझं घड्याळ बंद आहे.'



**प्रवासी** : घड्याळ बंद कसं ?
**बबनराव** : अहो ते ऑफिसचं आहे ना.'
**प्रवासी** : म्हणजे.
**बबनराव** : अहो आज रविवार आहे. त्यामुळे त्यानं आज सुट्टी घेतली आह.

''पिंकी अगं पिंकी इकडे ये जरा,'' आईने जोरात पिंकीला हाक मारली. पिंकी निवांत उड्या मारत मारत आली आणि म्हणाली, काय गं आई? आई म्हणाली, अगं काल मी वाटीत पाच पेढे ठेवले होते. आत एकच उरला आहे.' पिंकी, ओरडतेस कशाला रात्री अंधारात तो एक दिसला नाही. ठीक आहे. आत्ता खाते. आण इकडे.

**महिलायन**

## पहिल्या मुलाकडे दुर्लक्ष नको

नव्या बाळाकडे लक्ष देणं ही आई-वडील आणि तू अशा तिघांचीही जबाबदारी आहे, हे त्याला सौम्य शब्दात समजावून सांगावं. नव्या पाहुण्यामुळे पहिल्या मुलासाठी जास्त वेळ देऊ शकत नसाल तर त्याचा परिणाम त्याच्या मानसिक विकासावर होतो. तो आपल्याला एकटं समजू लागतो. त्यामुळे दोघांनाही सारखाच वेळ देता येईल, यासाठी प्रयत्नशील रहा. तुमच्या तोंडात सारखं नव्या बाळाचं नाव येत असेल तर थोड्या थोड्या वेळाने पहिल्या मुलाविषयीही बोललं पाहिजे. त्यामुळे आई आपल्यावर पहिल्यासारखंच प्रेम करत आहे, अशी भावना त्याच्या मनामध्ये निर्माण होईल. आपण घरातील छोट्या छोट्या कामांमध्ये मोठ्या मुलांची मदत घेऊ शकता. त्यामुळे त्या मुलालाही चांगलं वाटेल आणि तो कामात व्यस्तही राहिल. कपाटात पुस्तकं ठेवणं, नवीन बाळासाठी कपडे आणून देणं अशी छोटी छोटी कामं त्याला सांगू शकता. यामुळे तुम्ही काहीही न सांगता त्याला आपण मोठे झालो आहोत, याची जाणीव होईल. त्याचप्रमाणे नव्या बाळाशी खेळण्यांनी खेळायला किंवा त्याच्याकडे लक्ष द्यायला आपण त्याला सांगू शकतो. ही कामं त्याला आवडत नसतील तर त्याच्यावर दबाव मात्र टाकू नका. कोणती कामं करायला तुला आवडतील, असं त्याला विचारायला हरकत नाही. त्याच्याशीही छोटे छोटे खेळ खेळावेत. छोट्या मुलाला खायला घालायचं असेल त्यावेळी तुमच्या पहिल्या मुलाने खेळण्यासाठी हट्ट धरला तर 'तुझ्याशी खेळण्यासाठी वेळ नाही' असं त्याला म्हणू नका. त्याऐवजी 'याला भरवून झालं की आपण दोघंही खेळूया' असं त्याला सांगा. याशिवाय लहान मूल झोपल्यानंतरही मोठ्या मुलाशी बोलता येईल किंवा त्याच्या आवडीचा पदार्थ बनवून त्याला खाऊ घालता येईल.

**सामान्यज्ञान**

## सियामिज माशांचे अनोखे जीवन

माशांचे जग मोठे मोहक असते. रंगीबेरंगी मासे आपले गुण, आकार, प्रकारांमुळे स्वतःची खास ओळख निर्माण करतात. विविध माशांपैकी सियामिज हा मासा सुंदर रंगीत असून ॲक्वेरियममध्ये फारच सुरेख दिसतो. लहान मुलांना हा रंगीत मासा खूपच आवडतो. सियामिज माशाची काही वैशिष्ट्ये आहेत. हा मासा श्वास घेण्यासाठी पाण्याच्या पृष्ठभागावर येतो. श्वास घेण्यासाठी शरीरातील लॅबोरिंथ नावाच्या विशिष्ट भागाचा तो वापर करतो. लॅबोरिंथ एखाद्या कारणामुळे शरीरापासून वेगळे झाले तर घुसमटून याचा मृत्यू होतो. हा मासा दोन ते तीन इंच लांबीचा असतो. समुद्री कीडे, मृत जनावरे यांचे भोजन असते. या व्यतिरिक्त पाण्याच्या पृष्ठभागावरील मच्छरांच्या किंवा कीटकांचे लार्वा (पूर्ण वाढ न झालेले कीटक) हेही याचे खाद्य आहेत. हा मासा दोन ते तीन वर्षांपर्यंत जिवंत राहतो. (पूर्वार्ध)

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ **http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com**

# मी का होते वासनेची बळी ?



समाजात वावरताना महिला, मुली खरचं सुरक्षित आहेत का? लैंगिक आत्याचारापासून महिलांनी आपला बचाव कसा करावा? लैंगिक आत्याचरापासून मुलींचे संरक्षण करण्यासाठी शालेय व्यवस्थापनेने कोणती काळजी घ्यावी? याबाबत दैनिक '**पंढरी संचारने**' घेतलेला आढावा



**गेल्या काही वर्षांमध्ये महिलांबरोबर शालेय विद्यार्थीनींवरील लैंगिक आत्याचाराच्या घटनेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. या घटनांमुळे महिलांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**

**सहा महिन्याच्या बाळापासून ८० वर्षाच्या महिलेवर लैंगिक आत्याचार झाल्याच्या बातम्या आपण वाचतो. या बातम्यांमुळे आपल्या मनात चीडही निर्माण होते. मात्र असे घृणास्पद प्रकार थांबवण्यासाठी ठोस पाऊले उचलणे गरजेचे आहे.**



## महिला/ मुली असुरक्षित?

शाळा म्हणजे विद्येचं मंदीर मानले जाते, मात्र सध्या शाळांमध्येही अगदी घृणास्पद प्रकार समोर येऊ लागले आहेत. गेल्या काही महिन्यांमध्ये राज्यात शालेय मुलींवरील आत्याचाराच्या घटना वाढल्या आहेत. ऑगस्ट महिन्यामध्ये मुंबईलगतच्या ठाणे जिल्ह्यातल्या बदलापूरमधील शाळेमध्ये दोन चिमुकल्या मुलींवर लैंगिक अत्याचाराची घटना घडली. या



घटनेनंतर संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली होती. त्यानंतर राज्यातील पुणे, ठाणे अकोल्यासारख्या अनेक शहरांमध्ये अशाच प्रकारच्या घटना घडल्याचे समोर आले. शाळा व महाविद्यालये हे शिक्षणाचे केंद्र मानले जाते.

मात्र शिक्षणाच्या या पवित्र दालनात मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न उभा ठाकला आहे. अनेक शाळांमध्ये विद्यार्थीनी असुरक्षित आहेत. लैंगिक अत्याचार व बलात्काराच्या घटना घडत आहे. या घटनांनंतर शाळां, महाविद्यालयांमध्ये जाणारी आपली मुलगी खरचं सुरक्षित आहेत का? असा प्रश्न पालकांच्या मनात येत आहे.

शाळां, महाविद्यालयांमध्येच नाही तर रत्यावरुन चालताना किंवा ऑफिसमध्ये काम करतानाही अनेकदा महिला लैंगिक आत्याचाराला बळी पडतात. मात्र, अनेकदा भीतीपोटी मुली किंवा महिला याबाबत कुठेही याबाबत बोलत नाही.

देशात महिला आजही असुरक्षिततेच्या छायेखाली जगत असल्याचे महिला आणि बालविकास खात्याने केलेल्या पाहणीत स्पष्ट दिसते आहे.

समाजात रोजच अवतीभवती घडणारे अपघात, खून, बलात्कार, छेडछाड, अतिप्रसंग यातून असुरक्षित शहराची जाणीव होत असते. त्यामुळे घराबाहेर पडलेली आपली मुलगी सुरक्षित आहे ना याबाबत घरच्यांना काळजी लागून राहिलेली आसते.

महिलांवर केवळ बाहेरच अत्याचार होतात असे नाही तर घराच्या चौकटीतही महिला सुरक्षित नाहीत. अनेक प्रसंगात जवळच्या नातेवाइकांकडून व पतीकडूनही अत्याचार केला जातो. मात्र घरातील गोष्ट बाहेर सांगायला नको या विचारानेच अनेक महिला गप्प बसतात. अशा घटनांमुळे पवित्र नात्यालाही काळीमा फासली जात आहे, ही सर्वाधिक चिंताजनक बाब मानली जात आहे.

एका सर्वेमध्ये महिलासांठी सुरक्षित व असुरक्षित असणाऱ्या देशांची यादी जाहीर करण्यात आली होती. महिलांसाठी सुरक्षित असणाऱ्या देशांच्या यादीत भारताचा ८७ वा क्रमांक लागतो.

## लैंगिक अत्याचारापासून मुलांना असे ठेऊ शकता सुरक्षित

### गुड टच, बॅड टच

लहानपणापसूनच 'मुलांना गुड टच, बॅड टच याबाबत मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. परंतु याला 'गुड टच, बॅड टच' पेक्षा 'सेफ आणि अनसेफ टच' असं म्हणायला हवं. अनेकदा ओळखीची लोक असल्याने त्यांचा स्पर्श बॅडच असेल हे त्यांच्या लक्षात येत नाही. आणि ते ओळखीच्या व्यक्तींकडून लैंगिक आत्याचाराला बळी पडतात. त्यामुळे त्यांना 'सेफ आणि अनसेफ टच' काय आहे हे समजवायला हवं."

### खुला संवाद हवा

बहुतांश पालक आपल्या मुलांबरोबर लैंगिकतेबाबत संबंधित विषयावर बोलणे टाळतात. 'लैंगिकतेबाबत पालक आणि मुलांमध्ये बोलणं होत नाही. मुलगी आहे तर असं बसायला नको, असे कपडे घालायला नको असं सांगितलं जातं. त्यामुळे लैंगिकता ही काहीतरी घाण गोष्ट आहे, याच्याबद्दल बोलायला नाही पाहिजे असं वातावरण निर्माण होतं. त्यामुळे त्यातून काही घडलं तर त्या अत्याचाराबाबत आई वडिलांना सांगितलं जाण्याची शक्यता कमी असते. सांगितलं तरी तुझंच काहीतरी चुकलं असेल असं म्हणून मुलीचा आवाज दाबून टाकण्याच्या सुद्धा गोष्टी घडतात."



### सुरक्षित वातावरण

"मुलांवर अत्याचार झाला असेल तर कुठल्याच पद्धतीने त्यांची चूक नसते. त्यामुळे प्रौढ लोकांवर जास्त काम करण्याची गरज आहे. मुलांना सेफ राहण्यास सांगण्यापेक्षा त्यांच्यासाठी सेफ परिस्थिती कशी तयार करु शकतो याचा विचार करायला हवा लहान मुलांना नाही म्हणायची स्पेस त्यांना द्यायला हवी. त्याचबरोबर वयाबरोबर त्यांना लैंगिकतेबाबतचं मार्गदर्शन करणं गरजेचं आहे. पालक आणि मुलांबाबत एक मोकळी जागा असायला हवा. जेणेकरुन त्यांच्यासोबत चुकीची गोष्ट घडली तर त्यांना त्यांच्या पालकांना ते निर्भिडपणे सांगू शकतील,"



### योग्य वयात योग्य शास्त्रीय माहिती

"वयात येणाऱ्या मुलांना योग्य वयात योग्य शास्त्रीय माहिती द्यायला हवी. शरीरात होणारे बदल, हार्मोनमध्ये होणारे बदल, नैसर्गिक बद्दल याबाबत पालकांनी आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी बोललं पाहिजे. मुलांच्या शरीरात जेव्हा हे बदल होत असतात तेव्हा मुलांना अनेक गोष्टींबद्दल आकर्षण वाटू शकतं. मुलांना आकर्षणातील धोके सांगितले तर अशा घटना रोखण्यास मदत होते."



### प्रेम नव्हे हे तर केवळ आकर्षण

"विद्यार्थ्यांना शरीरात होणाऱ्या नैसर्गिक बदलांबद्दल सांगितल्यानंतर प्रेम आणि आकर्षण याबद्दल सांगितलं जातं. काही रोल प्लेच्या माध्यामातून त्यांना आकर्षणाबद्दल सांगितलं जातं. त्यात कुठलीही भावनिक जवळीक नाहीये त्यात शारिरीक आकर्षण आहे हे समजावलं जातं. त्यामुळे त्यांना प्रेम आणि आकर्षण यामधील फरक समजण्यास मदत होते," असंही आपटे सांगतात.

### दाद कुणाला मागायची ?

'अत्याचाराच्या घटनांमध्ये एखादा स्पर्श केल्यानंतर तुम्हाला तो सुरक्षित वाटतोय याबाबत मुलांना मार्गदर्शन केलं जातं. एखादी व्यक्ती प्रायव्हेट पार्टला स्पर्श करत असेल त्याविषयी बोललं पाहिजे हे सांगितलं जातं. त्यात एका विश्वासाच्या व्यक्तीला त्यांनी सांगायला हवं असं त्यांना सांगितलं जातं. त्याचबरोबर शाळेतील समुपदेशिका, किंवा शिक्षिका यांना देखील मुलं त्यांच्यावर झालेल्या अत्याचाराबाबत सांगू शकतात."

## कोंढवा परिसरात राहणाऱ्या १६ वर्षीय मुलीवर बलात्कार

■ **पंढरी संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** दरम्यान नुकतीच पुण्यामधून एक धक्कादाक बातमी समोर आली. पुण्याच्या कोंढवा परिसरात राहणाऱ्या १६ वर्षीय मुलीवर तिच्याच ओळखीतील २३ वर्षीय तरुणाने बलात्कार केला. एवढंच नाही तर तरुणी त्याला भेटायला न गेल्यास तिचे खासगी फोटो व्हायरल करण्याची धमकीही दिली

> गेल्या काही वर्षांच्या कालावधीत महिला आणि शालेय विद्यार्थीनींवर अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे, विशेष म्हणजे या नराधमांना कायद्याचीही भीती उरलेली नाही. त्यासाठी शासन आणि पोलीसांच्या माध्यमातून अनेक कायदे करण्यात आले आहेत, तरीही या प्रकारांना आळा बसत नाही ही चिंतेची बाब आहे. परिणामी त्यावर आता समाजानेच पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे.
>
> **— नरेंद्र व्यवहारे,**
> **माजी अध्यक्ष, शिक्षण मंडळ, पुणे मनपा**

> महिलांना आणि विद्यार्थीनींना सुरक्षा देणे ही समाजाची जबाबदारी आहे, तरीही हा समाज त्याकडे फारसे गांभीर्याने पाहात नाही. ही बाब चिंताजनक असून त्यामुळेच समाज रसातळाला जात असून त्याचा नाहक फटका महिला वर्गाला सहन करावा लागत आहे, ही बाब लक्षात घेऊन महिलांनीच आता रणरागिणी होण्याची आवश्यकता आहे.
>
> **— बाळासाहेब जानराव,**
> **माजी सदस्य, शिक्षण मंडळ, पुणे मनपा**

> शालेय शिक्षण देत असताना विद्यार्थीनींना अशा घटनांपासून वाचविण्यासाठी शाळा प्रशासनाच्या वतीने विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत, त्यासाठी त्यांना 'गुड टच आणि बॅड टच' याचीही माहिती देण्यात येत आहे. मात्र; शिक्षिका यासंदर्भात प्रयत्न करत असतानाच कुटुबिंयांनीही अशा बाबींकडे प्रकर्षाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.
>
> **— नीलम जाधव,**
> **शिक्षिका, प्राथमिक विद्यालय पुणे महापालिका**

## शालेय व्यवस्थापनेने कोणती काळजी घेणे गरजेचे आहे

- १. शाळांनी शिक्षक, स्कूलबस कर्मचारी, इतर सेवा कर्मचाऱ्यांची सखोल पार्श्वभूमी तपासणी केली पाहिजे.
- २. मुलींच्या देखभालीसाठी महिला मदतनीस असाव्यात, महिलांचे प्रसाधन गृह महिला कर्मचाऱ्यांनीच स्वछ ठेवावे.
- ३. जर कोणत्याही कर्मचाऱ्याविरुद्ध गैरवर्तनाची तक्रार मिळाली, तर तत्काळ त्यांना निलंबित करावे आणि त्वरित चौकशी सुरू करावी व पोलिस प्रशासनास माहिती द्यावी.
- ४. सुरक्षेच्या कारणास्तव काही कॉन्ट्रॅक्ट कर्मचारी ठराविक काळानंतर (सुरक्षा कर्मचारी, सफाई कर्मचारी व बस ड्रायव्हर्स) अदलाबदल करण्यात यावी
- ५. विद्यार्थ्यांना त्यांच्या शारीरिक आणि मानसिक सुरक्षिततेबाबत शिक्षण दिले पाहिजे. त्यांना "चांगले स्पर्श आणि वाईट स्पर्श" याबाबत माहिती द्यावी.
- ६. शाळेत विद्यार्थ्यांना कोणत्याही गैरवर्तनाची तक्रार करण्यासाठी सोपी आणि गोपनीय प्रक्रिया उपलब्ध असावी.
- ७. विद्यार्थ्यांना कोणत्या व्यक्तीकडे जाऊन तक्रार करावी, हे स्पष्ट असावे. विशेषतः मुलींच्या तक्रारीची दखल घेण्यास महिला शिक्षक असाव्यात.
- ८. शाळेच्या परिसरात, विशेषतः संवेदनशील ठिकाणी, सीसीटीव्ही कॅमेरे लावलेले असावेत. यामुळे कोणत्याही अनधिकृत किंवा गैरप्रकाराची नोंद ठेवता येईल.
- ९. याशिवाय शाळेच्या संपूर्ण परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे, विशेषतः प्रवेशद्वार, कॉरिडोर आणि महत्त्वाच्या जागांवर सीसीटीव्ही कॅमेरे २४/७ सक्रिय असावेत आणि त्यांचे रेकॉर्डिंग नियमितपणे तपासले जावे.



- शाळेत सुरक्षा एजन्सी किंवा कर्मचाऱ्यांची नेमणूक करताना काही महत्त्वाच्या गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या आणि शाळेच्या संपूर्ण परिसराच्या सुरक्षिततेची खात्री करता येईल.

**योग्य ती नेमणुकीची प्रक्रिया राबवावी:**

- शाळेत प्रशिक्षित सुरक्षा कर्मचारी (महिला आणि पुरुष) असावेत, जे विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेतील.
- शाळेमध्ये स्थापणार सखी सावित्री समिती
- कामाच्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षितेसाठी विशाखा समितीची स्थापना करण्यात आली आहे, तशीच एक समिती आता शाळांमध्ये स्थापन करण्यात येणार आहे. शाळांमध्ये सखी सावित्री समिती असणेही आवश्यक आहे.



शाळांमध्ये होणाऱ्या लैंगिक अत्याचाराच्या घटनांबाबत बोलताना शाळांमध्ये 'सखी सावित्री समिती' स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी केली आहे.

- "शाळेच्या आवारात अशा घटना घडू नये म्हणून राज्यातील सर्व माध्यमांच्या सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये सीसीटिव्ही कॅमेरा बंधनकारक असेल, त्यात हार्डडीस्क असणंही अनिवार्य आहे. सर्व सरकारी शाळांमध्ये सीसीटिव्ही कॅमेरे लावण्यात येणार.
- शाळांमध्ये 'सखी सावित्री समिती' स्थापन करण्यात येईल. या समितीमध्ये महिला शिक्षक, मुख्यध्यापक, डॉक्टर, अंगणवाडीसेविका, विद्यार्थी, विद्यार्थिनी असतील. शाळांमधील वातावरण चांगलं करण्यासाठी ही समिती काम करेल. शाळेत काही आक्षेपार्ह आढळल्यास ही समिती त्याची चौकशी करेल. शिक्षण आयुक्तांकडे त्याची जबाबदारी असेल."
- "शाळांमध्ये पोलीस काका, पोलीस दीदी, समितीच्या सदस्यांची नावं आणि नंबर्स शाळेच्या दर्शनी भागात लावण्यात येईल. शाळेत 'गुड टच, बॅड टच' शिकवण्यात येईल. शाळेत तक्रार पेटी बसवण्यात येईल. शालेय शिक्षण, गृह विभागात समन्वयाने करू" असं देखील गायकवाड म्हणाल्या.
- शाळांमधला अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांसाठीचे उपक्रम यासाठी जसे काही नियम असतात, तसेच नियम विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही करण्यात आले आहेत. शाळांमध्ये सखी सावित्री समिती स्थापन करण्यात यावी, अशी घोषणा मार्च २०२२ मध्ये करण्यात आली. 'राज्यातील सर्व शाळांमध्ये मुला-मुलींच्या सुरक्षिततेसाठी व निकोप आणि समतामूलक वातावरण निर्मितीसाठी शासन स्तरावरून 'सखी सावित्री' समितीचे गठन करण्यात येत आहे' असं शासनाच्या परिपत्रकात म्हटले आहे.



## काय आहे सखी सावित्री

**शाळांमध्ये होणाऱ्या लैंगिक अत्याचाराच्या घटनांबाबत बोलताना शाळांमध्ये 'सखी सावित्री समिती' स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी केली**

## स्वसंरक्षणासाठी काय करावे...

- महिला व तरुणींनी स्वसंरक्षणासाठी कराटेचे प्रशिक्षण घ्यावे
- बाहेर पडताना स्वत:बरोबर पेपर स्प्रे किंवा मिरचीपूड ठेवावी
- रात्री उशिरा एकटे घराबाहेर पडणे टाळावे.
- खबरदारी म्हणून बाहेर पडताना घरच्यांना याबाबत माहिती द्यावी
- अनोळखी व्यक्तीबरोबर जास्त ओळख वाढवू नये.
- एखादी व्यक्ती त्रास देण्याचा प्रयत्न करत असेल तर याबाबत घरच्यांना व पोलिसांना महिती द्या
- मुलींनी न घाबरता आई-वडिलांबरोबर शिक्षकांबरोबर बोलणे गरजेचे आहे.



## तबब्ल १२ हजार ६०० तक्रारी

**राष्ट्रीय महिला आयोगाने २०२४ मध्ये दाखल झालेल्या महिला अत्याचाराच्या तक्रारीची संख्यावली जाहीर केली आहे. यावर्षी तबब्ल १२ हजार ६०० तक्रारी दाखल झाल्या आहेत. यामध्ये सर्वाधिक तक्रारी उत्तरप्रदेशमध्ये दाखल झाल्या आहेत.**

| | | |
|---|---|---|
| ६,४९२ उत्तर प्रदेश | ७७४ महाराष्ट्र | |
| १,११९ दिल्ली | ५१६ हरियाणा | |
| ३०४ तमिळनाडू | ५०९ दिल्ली | |
| ५८६ बिहार | ४०९ राजस्थान | ३०७ पश्चिम बंगाल |




# अर्थजगत

**रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरण समितीच्या यंदाच्या बैठकीनंतर, स्मॉल फायनान्स बँका (एसएफबी) पूर्व-मंजूर क्रेडिट लाइन व्यवस्थेअंतर्गत युपीआयद्वारे कर्ज देऊ शकतील,असा निर्णय घेण्यात आला आहे. म्हणजेच आरबीआयने आता छोट्या वित्त बँकांना युपीआयद्वारे पूर्व-मंजूर कर्ज देण्याची परवानगी दिली आहे. यामुळे युपीआयद्वारे पेमेंट करणारे कोणतेही पेमेंट करण्यापूर्वी क्रेडिट लाइन निवडू शकतात. युपीआय ग्राहकांना लवकरच या नवीन सुविधेचा लाभ घेता येणार आहे. छोटे व्यावसायिक, लघुउद्योजक आणि ग्रामीण आणि निम-शहरी भागातील व्यक्तींसह कर्जापासून वंचित गटांना मदत करण्याच्या उद्देशाने या हालचालीचा उद्देश आहे. यापूर्वी, ही सुविधा एसएफबी, प्रादेशिक ग्रामीण बँका आणि पेमेंट बँकांना उपलब्ध नव्हती.**

## पुन्हा नव्या शिखराकडे...?

नोव्हेंबर महिन्याची सांगता काहीशा निराशाजनक स्थितीत झाली असली तरी डिसेंबर सिरीजची सुरुवात करताना म्हणजे २९ नोव्हेंबरपासून भारतीय शेअर बाजाराने पुन्हा वरच्या दिशेने झेपावण्याची प्रक्रिया सुरु केली आणि २ ते ६ डिसेंबर या सप्ताहात ती तशीच कायम राहिल्याचे दिसून आले. वास्तविक पाहता, गतसप्ताहात बाजारावर परिणाम करणाऱ्या अनेक घटना-घडामोडी घडूनही त्या सर्वांतील सकारात्मकता स्वीकारत बाजाराने चढती भाजणी कायम ठेवल्याचे दिसले. गेल्या आठवड्यात मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स १९०६.३३ अंकांनी म्हणजेच जवळपास २.३८ टक्क्यांनी वधारून ८१,७०९.१२ वर बंद झाला; तर निफ्टीमध्ये गतसप्ताहात ५४६.७ अंकांची म्हणजेच



२.२६ टक्क्यांची वाढ झाली आणि हा निर्देशांक २४,६७७.८० अंकांवर बंद झाला. बँकनिफ्टीचा विचार करता ५१,७२९ पर्यंत खाली गेलेला हा निर्देशांक जोरदार उसळी घेत ५३,९३० पर्यंत झेपावून सप्ताहाखेरीस ५३५१२ समीप बंद झाला आहे. गेल्या आठवड्यामध्ये मिडकॅप, स्मॉलकॅपसह बहुतांश क्षेत्रातील समभागांमध्ये दमदार तेजी दिसून आली आहे. सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये गेल्या सहा महिन्यातील सर्वात मोठी साप्ताहिक वाढ दिसून आली.

**शेअर बाजार**

वास्तविक, रिझर्व्ह बँकेच्या द्वैमासिक पतधोरणामुळे आणि त्याआधी जाहीर झालेल्या जीडीपीमधील घसरणीच्या आकडेवारीमुळे शेअर बाजारात चढउतार दिसून आले. परंतु अंतिमतः बाजाराने वाढीच्या दिशेने कौल दिला. रिलायन्स इंडस्ट्रीज, एचडीएफसी बँक, ॲक्सिस बँक, आयसीआयसीआय बँक, टीसीएस, स्टेट बँक ऑफ इंडिया, बजाज ऑटो यांसारख्या बाजारातील दिग्गज खेळाडूंची कामगिरी दमदार राहिल्यामुळे बाजाराला बूस्टर मिळाला.

रिझर्व्ह बँकेच्या द्वैमासिक पतधोरणामध्ये पतधोरण समितीचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी सलग११ व्यांदा रेपोदरामध्ये कोणताही बदल न करण्याचा निर्णय जाहीर केला. वास्तविक, आर्थिक विकास दर दोन वर्षांच्या नीचांकी पातळीवर गेलेला आहे. महागाईमध्य लक्षणीय वाढ झालेली आहे. तसेच रुपयानेही विक्रमी नीचांकी पातळी गाठली आहे. असे असूनही केंद्राकडून आरबीआयने व्याजदरात कपात करावी यासाठी दबाव येत होता. परंतु आरबीआयने त्याची दखल घेतली नाही. पण आरबीआयने अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर पूर्वअंदाजि;त ७.२ टक्क्यांवरुन कमी करुन ६.६ टक्क्यांवर आणला आहे. यामुळे बाजारात घसरण येईल अशी अपेक्षा होती. परंतु कॅश रिझर्व्ह रेशो म्हणजेच सीआरआरमध्ये अर्ध्या टक्क्यांची कपात करुन तो ४.५ टक्क्यांवरुन ४ टक्क्यांवर आणला आहे. यामुळे देशातील बँकिंग व्यवस्थेत १.१६ लाख कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध होणार आहे. मागील काही महिन्यांपासून बँकांना जी भांडवलटंचाई जाणवत होती त्या समस्येवर आरबीआयचा उतारा लाभदायक ठरणार आहे. याची शक्यता गृहित धरुन आरबीआयच्या पतधोरणानंतर बँकिंग समभागांनी जोरदार उसळी घेतली होती.

गतसप्ताहातील तेजीचे आणखी एक प्रमुख कारण म्हणजे विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून विक्रीचा मारा थांबवून खरेदीच्या दिशेने सुरू केलेला प्रवास. एफआयआयनी २४,४०० कोटींहून अधिक रक्कम ओतल्यामुळे बाजाराचा कल बदलल्याचे दिसून आले.

याखेरीज महाराष्ट्रातील सरकार स्थापनेचा तिढा सुटला आहे. अमेरिकन बाजारात नॅसडॅक निर्देशांकाने सार्वकालिक उच्चांकी पातळी गाठली आहे. कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण झाली आहे. या सर्वांचे सकारात्मक पडसाद भारतीय शेअर बाजारात दिसून आले.

चालू आठवड्याचा विचार करता टेक्निकल चार्टनुसार निफ्टीसाठी २४,३०० च्या पातळीवर भक्कम आधार आहे, तर २५००० ते २५२०० च्या पातळीवर अडथळा पातळी आहे. शुक्रवारची २४८५५ ची उच्चांकी पातळी तोडून वरच्या पातळीवर बाजार स्थिरावल्यास २५ हजारांपल्याड जाण्याचा मार्ग मोकळा होईल. याउलट २४३०० च्या खाली घसरल्यास २४१३३ च्या पातळीवर भक्कम आधार आहे. त्याखाली गेल्यास २३,९०० पर्यंतची घसरण पहावयास मिळू शकते.

सध्याचा बाजाराचा कल तेजीचा असला आणि बँकिंग क्षेत्र याचे नेतृत्व करताना दिसत असले तरी विकासदरांसंदर्भातील अनुमाने काहीशी चिंताजनक आहेत. त्यामुळे सेल ऑन राईज आणि बाय ऑन डिप्स या दोन्ही रणनीती जोखीम क्षमतेनुसार अवलंबायला हव्यात.

समभागांचा विचार करता टाटा पॉवरची आगामी गुंतवणूक योजना लक्षात घेता हा समभाग ५ ते १० टक्क्यांनी येणाऱ्या काळात वधारू शकतो. एसबीआय आणि एचडीएफसी बँक या समभागांमध्ये घसरण झाल्यास आधार पातळ्यांवर बाजाराचा कल पाहून खरेदीची संधी निश्चितपणाने साधायला हवी. रिअल इस्टेट कंपन्यांमध्ये सुरू असलेली तेजी पाहता ८०० रुपयांच्या आसपास असणारा कॅनफिन होम्सचा समभाग १०५० रुपयांचे लक्ष्य ठेवून खरेदी करता येईल. टेक्नॉलॉजी कंपन्यांमधील तेजीची लाट पाहता इन्फोसिसचा समभाग १९०० रुपयांसमीप खरेदी करुन २२०० रुपयांचे लक्ष्य ठेवता येईल. एबी कॅपिलटचा समभाग १९२ रुपयांना खरेदी करुन २२० रुपयांचे लक्ष्य ठेवता येईल.

बाजारातील चढउतारांचा वेग लक्षात घेता आणि देश-विदेशात घडणाऱ्या घडामोडींमुळे बाजारावर होणारे परिणाम पाहता आपली जोखीम कमीत कमी ठेवत स्टॉपलॉस टूल्सचा वापर करुन दीर्घकालीन गुंतवणुकीला प्राधान्य द्यावे.

◆◆◆

## युपीआयद्वारे कर्ज घेता येणार

स्मॉल फायनान्स बँका किंवा लघुवित्त बँका या प्रामुख्याने क्रेडिट सुविधा शोधणाऱ्या रांगेतील शेवटच्या व्यक्तींना किफायतशीर, तंत्रज्ञानावर आधारित बँकिंगसेवा देण्यासाठी ओळखल्या जातात. या बँका बँकिंग नियमन कायदा, १९४९ अंतर्गत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) द्वारे संचालित केल्या जातात. त्यांना आरबीआयकडून बँकिगचा परवाना देखील मिळतो. प्रीअप्रूव्हड् क्रेडिट लाईन हे एक आर्थिक उत्पादन असून सामान्य नागरिकांना सहज कर्ज मिळण्यासाठी ते तयार करण्यात आले आहे. याचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे याद्वारे ग्राहक त्यांच्या व्यवहाराच्या वेळी पूर्व-मंजूर क्रेडिट वापरू शकतात. उदाहरणार्थ, ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर खरेदी करताना, त्यांच्या खात्यातून पैसे देण्याऐवजी, ग्राहक युपीआय ॲपमध्ये उपलब्ध क्रेडिट लाइन निवडू शकतात आणि कोणत्याही अडचणीशिवाय पेमेंट करू शकतात. याद्वारे, सामान्य लोक किंवा लहान व्यावसायिक जे पहिल्यांदाच क्रेडिट वापरत आहेत ते देखील औपचारिक बँकिंगच्या कक्षेत सामील होऊन डिजिटल क्रेडिटच्या सुविधेचा लाभ घेऊ शकतील.

रिझर्व्ह बँकेच्या या निर्णयाचा सर्वाधिक फायदा गावे, शहरे, छोटी शहरे आणि महानगरांमध्ये राहणाऱ्या लोकांना होणार आहे, जे आतापर्यंत बँकिंग कर्ज प्रणालीचा लाभ घेऊ शकले नव्हते. देशात असे कोट्यवधी लोक आहेत ज्यांना त्यांच्या छोट्या व्यवसायासाठी काही दिवस किंवा आठवडे दररोज थोड्या पैशांची आवश्यकता असते आणि ते यासाठी बँकांना भेट देऊ शकत नाहीत. आरबीआयच्या या



निर्णयानंतर असे लोक आता यूपीआयद्वारे लघु वित्त बँकांकडून कर्ज घेऊ शकतील. यूपीएच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या आर्थिक व्यवहारांमुळे त्यांना मिळालेल्या क्रेडिटवर ही कर्जे त्या लोकांना उपलब्ध होतील. या सुविधेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे गरज असेल तेव्हा लगेच कर्ज उपलब्ध होईल. तुमच्या व्यवसायासाठी वस्तू खरेदी करताना तुम्ही पेमेंट करण्यासाठी या सुविधेचा लाभ घेऊ शकाल.

**बँकिंग विश्व**

आरबीआयच्या या निर्णयामुळे भारतीय बाजारपेठेतील 'क्रेडिट सर्कल' वाढेल, ज्याचा थेट फायदा भारतीय अर्थव्यवस्थेला होईल.

नाबार्डच्या अहवालानुसार, सुमारे ६०% ग्रामीण कुटुंबे अजूनही 'अनौपचारिक कर्जाच्या स्रोतांवर' अवलंबून आहेत. असंघटित कर्जावरील व्याजदर खूप जास्त आहेत. अहवालानुसार, अनौपचारिक सावकारांकडून आकारले जाणारे व्याजदर साधारणपणे २४% ते ६०% प्रति वर्ष, कर्जदाराच्या गरजेनुसार आणि प्रोफाइलवर अवलंबून असतात. अशी अनौपचारिक कर्जे विश्वास आणि नातेसंबंधांच्या आधारे दिली जातात, यासाठी गरजू व्यक्तीला दीर्घ प्रक्रियेतून जावे लागत नाही, तसेच त्याला फारशी कागदपत्रेही करावी लागत नाहीत. तसेच, औपचारिक कर्ज देणाऱ्या संस्थांच्या विपरीत, अनौपचारिक सावकार अनेकदा कर्ज परतफेडीच्या अटींबाबत लवचिक असले तरी ते कर्जदारांसाठी हिताचे नसतात.

या पार्श्वभूमीवर आरबीआयचा हा निर्णय महत्त्वाचा ठरतो. या सुविधेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांना जास्त तांत्रिक ज्ञान किंवा मेहनत करण्याची गरज नाही. तुमच्या युपीआयमध्ये 'क्रेडिट लाइन' पर्याय निवडावा लागेल. त्यानंतर तुम्हाला तुमच्या पसंतीची बँक निवडावी लागेल. यानंतर तुम्हाला किती कर्ज मिळू शकते हे कळू शकेल. त्यानंतर तुम्ही तुमचे क्रेडिट लाइन खाते लिंक करून पिन तयार करा आणि या सुविधेचा लाभ घ्या. कर्जाची परतफेड करण्याची पद्धत तुमच्या बँकेने ठरवून दिलेल्या प्रक्रियेनुसार असेल. तुम्ही वेळेवर कर्जाची परतफेड केल्यास, तुमचा क्रेडिट स्कोअर सुधारेल आणि तुम्हाला भविष्यात पुन्हा कर्ज घेणे सोपे होईल.

◆◆◆

## सोन्याच्या बारसाठीही हॉलमार्किंगची सक्ती?

केंद्र सरकार सोन्याच्या बारवर हॉलमार्किंग बंधनकारक करण्याच्या शक्यतेवर विचार करीत आहे. त्याचबरोबर ग्राहकांचे हित जपण्यासाठी प्रयोगशाळेत तयार करण्यात आलेल्या हिऱ्यांच्या नियमनासाठी एखादी चौकट तयार केली जाण्याची शक्यता असल्याचे ग्राहक व्यवहार सचिव निधी खरे यांनी सांगितले.

भारतीय उद्योग महासंघाने आयोजित केलेल्या भारतीय दागिने या विषयावरील परिषदेत बोलताना खरे यांनी सांगितले की, दागिने निर्मिती क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचे आहे.



कारण या क्षेत्रातून रोजगार निर्मिती होते. त्याचबरोबर निर्यात होऊन भारताला परकीय चलन उपलब्ध होते.

भारताने याच दृष्टिकोनातून सोन्याच्या दागिन्याच्या हॉलमार्किंगची मोहीम हाती घेतली आहे. २३ जून २०२१ पासून सोन्याच्या दागिन्यावर हॉलमार्किंग करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून आतापर्यंत तब्बल ४० कोटी दागिन्यावर हॉलमार्किंग झाले आहे. यामुळे दागिने खरेदी करताना दागिन्याची ग्राहकांना खात्री मिळते.

आता असाच प्रयोग सोन्याचे बार आणि नाण्यावर करण्याचा प्रयत्न चालू आहे.त्यामुळे गुंतवणूकदारांना सोने खरेदी करताना संधीग्धतेचा सामना करावा लागणार नाही. त्या म्हणाल्या की दागिने उत्पादक अनेकदा सोन्याचे बार खरेदी करतात. त्याचबरोबर या बारची फेरखरेदी होते. त्यामुळे स्रोतांतच सोने शुद्ध असल्याची खात्री मिळण्याची आवश्यकता आहे. यासाठी सोन्याच्या बार आणि नाण्यावर हॉलमार्किंग केल्यानंतर हा प्रश्न बऱ्याच प्रमाणात निकाली निघू शकतो.

भारतातील सोन्याच्या दागिन्याची बाजारपेठ २०२३ मध्ये ४४ अब्ज डॉलरची होती. २०३० पर्यंत ही बाजारपेठ वाढून १३४ अब्ज डॉलरची होणार आहे. भारतातून सोन्याच्या दागिन्याची मोठ्या प्रमाणात निर्यात होते. एकूण भारतीय निर्यातीत या निर्यातीचा वाटा ३.५% आहे. या क्षेत्राचे महत्त्व ओळखून या क्षेत्राला विस्तारित करण्यासाठी भारत सरकार दागिने उत्पादकाच्या मदतीने अनेक उपाय योजना राबवित आहे. भारतात १.९५ लाख नोंदणीकृत दागिने उत्पादक आहेत. तर १६०० ठिकाणी हॉलमार्किंग केले जाते.

◆◆◆

## युनिफाइड लेंडिंग इंटरफेस : कर्जप्रक्रियेत येणार सुलभता

सध्या कर्ज घेण्याची प्रक्रिया खूपच किचकट आहे. यासाठी कर्जदाराला अनेक कागदपत्रांची पूर्तता करावी लागते. बँकांमध्ये हेलपाटे घालावे लागतात. कर्जदारांची ही अडचण लक्षात घेऊन आता सरकारने ही प्रक्रिया अधिक सुलभ करण्याचे ठरवले आहे. भारतीय रिझर्व्ह बँक गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी पेमेंट ॲप युपीआसारखे युनिफाइड लेंडिंग इंटरफेस प्लॅटफॉर्म लॉन्च करण्याची घोषणा केली आहे.


गेल्या वर्षी (ऑगस्ट २०२३), आरबीआयने फ्रिक्शनलेस क्रेडिट म्हणजेच सुलभ कर्ज देण्यासाठी तांत्रिक प्लॅटफॉर्मचा पायलट प्रोजेक्ट सुरू केला होता.

एक वर्षाच्या पथदर्शी प्रकल्पादरम्यान, मध्यवर्ती बँकेने किसान क्रेडिट कार्ड कर्ज, डेअरी कर्ज, चड्चए कर्ज, वैयक्तिक कर्ज आणि गृह कर्जावर लक्ष केंद्रित केले, ज्यांना जास्त मागणी आहे.

**माहीत आहे का?**

ग्राहकांना काय फायदा होणार?

आज बाजारात अनेक ॲप्स झटपट कर्ज देण्याचा दावा करताहेत. परंतु, यावर आरबीआयचे नियंत्रण खूपच मर्यादित आहे. या ॲप्सद्वारे अनेकदा ग्राहकांचा, कर्जदारांचा मानसिक छळ केल्याचा आरोप होतो. पण, जर आरबीआय युएलआय प्लॅटफॉर्मवरील ॲप्सवर थेट नजर ठेवणार असेल तर तेथे अनियमितता निश्चितच कमी होतील. तसेच या व्यासपीठामुळे विशेषतः ग्रामीण आणि लहान ग्राहकांसाठी कर्जाचे मूल्यांकन मोठ्या प्रमाणात सुलभ होईल.



युनिफाइड लेंडिंग इंटरफेसची रचना कर्जप्रक्रियेसाठी लागणारा वेळ आणि कागदी काम कमी करण्यासाठी करण्यात आली आहे. हे ओपन ॲप्लिकेशन प्रोग्रामिंग इंटरफेस (एपीआय) सह ओपन आर्किटेक्चर एकत्र करते. यामुळे, वित्तीय संस्था सहजपणे 'प्लग अँड प्ले' मॉडेलमध्ये समाविष्ट होऊ शकतात.

युएलआय ॲप आधार, ई-केवायसी, राज्य सरकारच्या जमिनीच्या नोंदी, पॅन प्रमाणीकरण आणि अकाउंट ॲग्रीगेटरसह विविध स्रोतांकडून डेटा संकलित करेल. ते दुग्ध सहकारी संस्थांकडील दुधाचा डेटा आणि घर किंवा मालमत्ता शोध डेटा यासारख्या सेवांशी देखील जोडले जाईल. यामुळे तुम्ही युपीआयमध्ये ज्याप्रमाणे फक्त तुमचा पिन टाकून पेमेंट करता, त्याच प्रकारे युएलआयमध्ये तुम्ही पात्र असल्यास, तुमचा पिन टाकून तुम्ही कर्ज घेऊ शकता.

युनिफाइड पेमेंट इंटरफेस एप्रिल २०१६ मध्ये लाँच करण्यात आले. ८ वर्षांच्या प्रवासात युपीआयने डिजिटल पेमेंटचे जग बदलून टाकले. आज सबंध देशभरात पानाच्या दुकानांपासून ते भाजीच्या स्टॉलपर्यंत, तुम्हाला क्युआर कोड स्कॅनर बसवलेले दिसताहेत. इतर अनेक देशांनीही भारताचे युपीआय मॉडेल स्वीकारले आहे. आता या यशाची पुनरावृत्ती करण्यासाठी युएलआयची संकल्पना राबवली जाणार आहे.

◆◆◆

## गुंतवणुकीचा नवा पर्याय

**कोटक महिंद्रा ॲसेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेडने कोटक ट्रान्सपोर्टेशन अँड लॉजिस्टिक्स फंड लाँच केला. ट्रान्सपोर्टेशन आणि लॉजिस्टिक्स संकल्पनेवर आधारित ही एक ओपन एंडेड इक्विटी स्किम आहे. गुंतवणूकदारांना 'एनएफओ'च्या कालावधीत किमान हजार रुपये आणि त्यानंतर एक रुपयांच्या कितीतरी पटीत रक्कम गुंतवता येणार आहे.**





या फंडमध्ये पैसे गुंतवण्यापूर्वी काही गोष्टी जाणून घ्या.

१) कोटक ट्रान्सपोर्टेशन अँड लॉजिस्टिक्स फंडचा उद्देश परिवहन, लॉजिस्टिक्स आणि संबंधित उपक्रमात सामील कंपनीच्या शेअरमध्ये गुंतणूक करून चांगला परतावा देणे. प्रामुख्याने गुंतवणुकीतून दीर्घकाळापर्यंत उच्च परतावा मिळवण्याचा उद्देश आहे. या संकल्पनेत ट्रान्सपोर्टेशन इन्फ्रास्ट्रक्चर, लॉजिस्टिक्स सर्व्हिसेस आणि कुशल सस्टेनेबल ट्रान्सपोर्टेशनसाठी इनोव्होटिव्ह काम करणाऱ्या कंपन्यासमवेत व्यवसाय करण्याबरोबरच या सेक्टरमध्ये गुंतवणूक करणाऱ्या आर्थिक कंपन्यांच्या संबंधित व्यावसायिकांचा देखील समावेश आहे. फंडचे प्रमुख वैशिष्ट्ये: वाढती गरज, अपेक्षा या आधारे ट्रान्सपोर्टेशन (परिवहन) अणि लॉजिस्टिक्स इकोसिस्टिममध्ये वेगाने होणाऱ्या बदलापासून प्रेरणा घेत भारतात वाढत्या परिवहन आणि लॉजिस्टिक्स उद्योगात गुंतवणूक करण्याची संधी देणे.

गुंतवणुकीची रणनिती: हा फंड लार्जकॅप, मिडकॅप आणि स्मॉलकॅप कंपन्यांसह वेगवेगळ्या मार्केट कॅपिटायजेशनमध्ये गुंतवणूक करण्याची सुविधा देते.

ग्रोथची शक्यता: ट्रान्स्पोर्टेशन आणि लॉजिस्टिक्स इंडस्ट्री ही भारतमाला, सागरमाला, डेडीकेटेड फ्रेट कॉरिडॉर (डीएफसी) आणि मल्टी मॉडेल लॉजिस्टिक्स पार्कसारख्या सरकारी उपक्रमाने विकास करण्यासाठी सज्ज आहे. तंत्रज्ञानाची प्रगती (टेक्नॉलॉजी ॲडव्हान्समेंट), असंघटितपासून संघटित क्षेत्रापर्यंतचे होणारे बदल आणि मॅन्यूफॅक्चरिंग घडामोडीतील तेजी ही या संकल्पनेला आणखी बळ देण्याचे काम करते. कोटक महिंद्रा असेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश शहा यांच्या मते, कोटक ट्रान्सपोर्टेशन अँड लॉजिस्टिक्स फंड लाँच करण्याबरोबरच आम्ही गुंतवणुकदारांना भारतात वेगाने बदलणाऱ्या परिवहन आणि लॉजिस्टिक्सच्या संकल्पनेत गुंतवणूक करण्याची संधी देत आहोत. ही प्रगती वाहन मालकांच्या संख्येत वाढ आणि प्रती व्यक्तीच्या उत्पन्न वाढीतून दिसते. तसेच कोळसा आणि तेल यासारख्या नैसर्गिक इंधनांऐवजी इलेक्ट्रिक वाहनांचा वाढता वापर या सारख्या बदलासह अनेक घटकांचा लॉजिस्टिक्स अणि ट्रान्स्पोर्टेशन सेक्टरवर प्रभाव आहे. भारतमाला आणि गतीशक्ती सारखे प्रमुख सरकारी उपक्रम, लॉजिस्टिक्सच्या क्षेत्रात व्यापाराची संधी देतील आणि विस्तार करतील. भारतात विकसित मॅन्युफॅक्चरिंग सेक्टरसह ट्रान्स्पोर्टेशन (परिवहन) आणि लॉजिस्टिक्स इंडस्ट्री देखील विस्तारासाठी सज्ज आहे.

६) कोटक महिंद्रा असेट मॅनेजमेंट कंपनीचे अधिकारी हर्ष उपाध्याय यांच्या मते, ट्रान्स्पोर्टेशन आणि लॉजिस्टिक्सची संकल्पना ही वाढती ग्राहकशक्ती, प्रती व्यक्तीचे वाढते उत्पन्न, ई कॉमर्स, ऑटो-ऑटो ॲसिलरी बिझनेसमधील ग्रोथ यासारख्या अनेक फॅक्टरचा लाभ मिळवणारी आहे. एक कुशल लॉजिस्टिक्स नेटवर्क तयार करून ट्रान्स्पोर्टेशनसंबंधी खर्च कमी करण्यावर सरकारकडून दिला जाणारा भर ही बाब केवळ या सेक्टरच्या ग्रोथसाठी मदत करणार नाही तर अनेक कंपन्यांना या क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी प्रोत्साहित करेल. गेल्या पाच वर्षांत या सेक्टरमध्ये लिस्टेड कंपन्यांची संख्या ४४ टक्क्यांनी वाढली. आगामी काळात ट्रान्स्पोर्टेशन आणि लॉजिस्टिक्स सेवेच्या मागणीत वाढ होणार आहे.

◆◆◆

## इमर्जन्सी फंड : वित्तीय शहाणपणाचे पाऊल



वैद्यकीय आणीबाणीसाठी निधीची व्यवस्था करणे हे बऱ्याचदा कठीण काम असते कारण त्यासाठी ताबडतोब मोठी रक्कम जमा करावी लागते. अशा परिस्थितीत कुटुंबांनी या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी आगाऊ तयारी करणे गरजेचे आहे. भारतात वैद्यकीय उपचारांसाठी खर्च खूप जास्त आहे. बहुतेक रुग्णांना कोणतेही वैद्यकीय विमा संरक्षण नसते. वैद्यकीय विमा कवच असले तरी अनेकदा ते प्रचंड खर्च भागवण्यासाठी पुरेसे नसते. पुरेसे वैद्यकीय विमा संरक्षण असलेल्या लोकांनाही त्यांच्या घराजवळ नेटवर्क हॉस्पिटल नसणे यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागू शकते. अशा परिस्थितीत त्यांना स्वतःच्या खिशातून पैसे द्यावे लागतात आणि नंतर परतफेड करावी लागते. भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाच्या शेवटच्या वार्षिक अहवालानुसार, एकूण नोंदणीकृत ७०,००० कोटी रुपयांच्या आरोग्य विमा दाव्यांपैकी, प्रतिपूर्ती केलेल्या दाव्यांची रक्कम होती सुमारे २८,००० कोटी रुपये. यावरुन अनेक गोष्टींचा अंदाज येऊ शकतो.

**म्युच्युअल फंड**

वैद्यकीय आपत्ती ओढावल्यास आवश्यक असणारा पैसा उभा करण्यासाठी कर्जाशिवाय पर्याय उरत नाही. बहुतेक वित्तीय संस्था नवीन ग्राहकांसाठीही काही तासांत वैयक्तिक कर्ज प्रक्रिया पूर्ण करतात. पूर्व-मंजूर कर्जे किंवा पगार खात्याशी जोडलेली कर्जे देखील काही मिनिटांत मंजूर केली जाऊ शकतात. पण पर्सनल लोनवरील व्याजदरही जास्त असतात. साधारणपणे, वैयक्तिक कर्जाचे व्याज दर ९.९ ते २०.६ टक्के पर्यंत असतात. परंतु ज्या लोकांचा बँकेशी कोणताही संबंध नाही, म्हणजेच जे कर्ज देणाऱ्या बँकेचे ग्राहक नाहीत, त्यांना वैयक्तिक कर्ज मिळणे कठीण होऊ शकते. क्रेडिट कार्डद्वारे तुम्हाला लगेच पैसे मिळू शकतात. त्यामुळे रुग्णाला ॲडमिट करताना आवश्यक रकमेसाठी क्रेडिट कार्ड उपयुक्त ठरू शकते. क्रेडिट कार्डवरील व्याजमुक्त कर्जाचा कालावधी ३० ते ५० दिवसांचा असतो. व्याजमुक्त कालावधीनंतर, दर महिन्याला २.५ ते ४ टक्क्यांपर्यंत दंड आकारणी केली जाते. सबब क्रेडिट कार्डचा वापर प्रारंभिक पेमेंटपर्यंत मर्यादित ठेवणे आणि उर्वरित कर्जासाठी सुवर्ण कर्जासारखे पर्याय शोधणे योग्य ठरते. ज्या ग्राहकांना व्याजमुक्त कालावधीनंतरही पेमेंट करण्यासाठी अतिरिक्त वेळ लागतो त्यांनी क्रेडिट कार्ड कर्जाची शिल्लक समान मासिक हप्त्यांमध्ये रूपांतरित करावी. त्यामुळे व्याजाचा खर्च कमी होऊ शकतो. फिनटेक कंपन्या आता सबव्हेंशन मॉडेल अंतर्गत वैद्यकीय कर्ज देतात.हे मॉडेल मोबाईल फोनसारख्या ग्राहकोपयोगी वस्तूंसाठी उपलब्ध असलेल्या शून्य टक्के व्याज कर्जासारखे आहे. फिनटेक कंपन्या सहसा पारंपारिक कर्जदात्यांपेक्षा जलद आणि सुलभ अटींवर कर्ज देतात. यामध्ये आयव्हीएफ म्हणजे इन विट्रो फर्टिलायझेशनसारख्या प्रक्रियांसाठी कर्ज देखील समाविष्ट आहे. परंतु अशी कर्जे या संस्थांसोबत भागीदारी असलेल्या रुग्णालयांपुरती मर्यादित आहेत.

ही सर्व परिस्थिती लक्षात घेता शेवटच्या क्षणी पैसे उभे करण्याचा ताण टाळण्यासाठी वैद्यकीय आपत्कालीन निधी तयार करणे महत्त्वाचे आहे. सध्याची एकंदरीत महागडी खासगी वैद्यकीय व्यवस्था पाहता व्यक्तीकडे सुमारे १० लाख रुपयांचा निधी असावा. ज्या कुटुंबात वृद्ध सदस्य आहेत त्यांच्यासाठी हे विशेषतः महत्वाचे आहे. ही रक्कम बचत खाते आणि लिक्विड फंडामध्ये विभागली पाहिजे.

◆◆◆

## बंडखोरांनी मिळवला राजधानी दमास्कवर ताबा

# सीरियात अराजकता!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** सीरियातील बंडखोर सैन्याने रविवारी राजधानी दमास्कसवर ताबा मिळवत असद कुटुंबाची ५० वर्षांची राजवट संपुष्टात आणली. सीरियातील हुकूमशाहीचे युग संपल्यानंतर लोक रस्त्यावर उतरून जल्लोष करत आहेत. दरम्यान, राष्ट्राध्यक्ष बशर अल असद यांचा देश सोडून पळून जाताना मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. सिरियन हुकूमशहाचे विमान कोसळले किंवा बंडखोरांनी त्यांचे विमान पाडले, अशा बातम्या आल्या होत्या. सीरियाच्या हुकूमशहाचे विमान रहस्यमयरित्या गायब झाले आहे.

हयात तहरीर अल-शाम यांनी १३ वर्षांपूर्वी सीरियाचा हुकूमशहा बशरविरुद्ध युद्ध सुरू केले होते. एवढ्या प्रदीर्घ संघर्षानंतर बंडखोर गटांना यश मिळाले आहे. सीरियाचे लष्कर आणि पंतप्रधानांनी बंडखोरांकडे नियंत्रण सोपवण्याची मागणी करणारी निवेदने जारी केली आहेत, परंतु राष्ट्राध्यक्ष बशर अद्याप सापडलेले नाहीत. सरकारविरोधी दल लष्करी अधिकारी आणि गुप्तचर अधिकाऱ्यांची चौकशी करत असून, त्यांच्याकडे त्यांचा ठावठिकाणा असण्याची शक्यता आहे.

बशर बेपत्ता झाल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यांचे विमान बंडखोर गटांनी पाडल्याचा दावाही केला जात आहे. त्यांचे विमान पाडण्यात आल्याच्या बातम्या सोशल मीडियावर येत आहेत. ओपन सोर्स फ्लाइट ट्रॅकर्सने सांगितले की, दमास्कसहून निघालेले शेवटचे विमान इल्युशिन-७६ होते. त्यांचे विमान रडारवरून गायब झाले आहे.

### इराणला धक्का!

● सीरियातील सत्तापालटामुळे इराणची झोप उडाली आहे. कारण हमास आणि हिजबुल्लाहनंतर सीरियातील बशर सरकारही इराणच्या प्रमुख मित्र राष्ट्रांमध्ये होते. इराणमध्ये खळबळ उडाली आहे बंडखोरांनी सीरिया ताब्यात घेतल्याने रशिया आणि विशेषत: इराणला धक्का बसला आहे.

### विमान कोसळले?

● ओपन सोर्स फ्लाइट ट्रॅकर्सनुसार, बंडखोरांनी दमास्कसच्या विमानतळाचा ताबा घेण्याच्या काही वेळापूर्वीच विमानाने उड्डाण केले. मिळालेल्या माहितीनुसार, हे विमान उत्तरेकडे वळण्यापूर्वी पूर्वेकडे रवाना झाले. मात्र, होम्सच्या भोवती फिरत असताना विमानाचा सिग्नल गायब झाला. काही अप्रमाणित व्हिडिओदेखील समोर आले आहेत, ज्यात विमान कोसळताना आणि आग लागल्याचे दिसत आहे.

### बंडखोरांना समर्थन

● सीरियातील परिस्थिती अधिक चिंताजनक होत चालली आहे कारण आता सरकारच्या ताब्यातील भागही बंडखोरांनी त्यांच्या ताब्यात घेतले आहेत. वृत्तानुसार, बंडखोरांनी आता उत्तर आणि पूर्व होम्समधील अनेक सरकारी सीमा उद्ध्वस्त केल्या आहेत. होम्स शहरातून सैन्य माघार घेतल्यानंतर हजारो नागरिक रस्त्यावर उतरले आहेत. यानंतर त्यांनी "असाद गेले, होम्स मुक्त झाले" अशा घोषणा देत आनंदोत्सव साजरा केला.

## » Selected

### मोबाईलने घेतला शिक्षकाचा बळी

**भंडारा** : आपल्या रोजच्या वापरात मोबाईल ही आवश्यक अशी बाब झाली आहे. प्रत्येकाचे जीवन हे मोबाईलशी निगडीत आहे. परंतु मोबाईल ही तितकीच घातक गोष्ट असल्याचे सध्याच्या काळात दिसून येत आहे. काही दिवसांपासून मोबाईलच्या स्फोटांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. या घटनांमध्ये जीवावर बेतण्याचे प्रसंग जास्त प्रमाणात घडून येताना दिसत आहेत. अशीच घटना भंडारा जिल्ह्यात घडली आहे. नातेवाईकांच्या कार्यक्रमाला जाताना खिशात ठेवलेल्या मोबाईलचा स्फोट झाल्याने एका शिक्षकाला त्याचा जीव गमवावा लागला आहे. भंडारा जिल्ह्यात खिशात मोबाईलचा स्फोट झाला आणि जागीच शिक्षकाचा जीव गेल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. सुरेश संग्रामे असे त्या शिक्षकाचे नाव होते. शिक्षकाच्या शेजारी बसलेल्या वृद्धालादेखील गंभीर दुखापत झाली आहे. त्या वृद्धाला जवळच्या रुग्णालयात दाखल केले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. नत्थू गायकवाड असे त्या वृद्ध व्यक्तिचे नाव आहे.

### 'आयएनएस तुशील' नौदलाच्या ताफ्यात होणार दाखल

**नवी दिल्ली** : भारतीय नौदल सोमवारी रशियातील कॅलिनिनग्राड येथे 'आयएनएस तुशील' ही अत्याधुनिक बहुउद्देशीय मार्गदर्शित क्षेपणास्त्र युद्धनौका आपल्या ताफ्यात समाविष्ट करणार आहे. या समारंभाला संरक्षणमंत्री राजनाथसिंह हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, रशिया आणि भारत सरकारचे वरिष्ठ अधिकारी, संरक्षण अधिकारीदेखील उपस्थित राहणार आहेत. 'आयएनएस तुशील' ही प्रोजेक्ट ११३५.६ची क्रिवाक श्रेणीची अपग्रेड केलेली युद्धनौका आहे. 'आयएनएस तुशील' युद्धनौकेसाठी जेएससी रोसोबोरॉन एक्स्पोर्ट, भारतीय नौदल आणि भारत सरकार यांच्यात ऑक्टोबर २०१६ मध्ये करारावर स्वाक्षरी करण्यात आली होती. मॉस्को येथील भारतीय दूतावासाच्या अधिपत्याखाली कॅलिनिनग्राड येथे तैनात असलेल्या युद्धनौका पर्यवेक्षण पथकातील तज्ञांच्या भारतीय पथकाने जहाजाच्या बांधकामाचे बारकाईने निरीक्षण केले.

### हिंदूंवर अत्याचार सुरूच

**ढाका** : बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदूंवर कट्टरपंथीयांकडून होत असलेल्या हिंसाचाराची मालिका अद्याप सुरुच आहे. अशातच बांगलादेशातील ढाका येथील नमहट्टा भागात असलेल्या इस्कॉन मंदिरावर हल्ला झाल्याची माहिती समोर आली आहे. शुक्रवारी रात्री उशिरा या मंदिराला आग लागली. त्यामुळे श्रीलक्ष्मी-नारायण यांच्या मूर्ती आणि त्यांची वस्त्रे जळून खाक झाली. माध्यमातील वृत्तानुसार, ही घटना मध्यरात्रीनंतर पहाटे २ ते ३ च्या दरम्यान घडली. पेट्रोल टाकून हे मंदिर पेटवून देण्यात आले. हे मंदिर चालवणाऱ्या इस्कॉनवर बंदी घालण्याची मागणी ढाका उच्च न्यायालयाने फेटाळून लावली. त्यानंतर इस्लामिक कट्टरतावाद्यांनी हे मंदिर जबरदस्तीने बंद केले होते. या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त करताना इस्कॉनचे कोलकत्ता शाखेचे उपाध्यक्ष राधारमण दास म्हणाले, श्री लक्ष्मी-नारायण यांची मूर्ती आणि मंदिरातील सर्व वस्तू पूर्णपणे जळून खाक झाल्या आहेत. हा हल्ला बांगलादेशातील हिंदूंची दुरवस्था दर्शवतो. त्यांनी केंद्र सरकारला तसेच आंतरराष्ट्रीय समुदायाला बांगलादेशातील हिंदूंच्या सुरक्षेचे आवाहन केले आहे.

## उधमपूर येथे आढळले पोलिसांचे मृतदेह

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरच्या उधमपूर जिल्ह्यात रविवारी पहाटे दोन पोलीस कर्मचाऱ्यांचे मृतदेह आढळून आले. अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली. सहकारी पोलिसकर्मचाऱ्याची हत्या आणि आत्महत्येचा हा प्रकार असल्याचा संशय अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. उत्तर काश्मीरमधील सोपोर येथून जम्मू भागातील रियासी जिल्ह्यातील तलवारा येथील सहाय्यक प्रशिक्षण केंद्रात (एसटीसी) हे पोलिस जात होते.

सकाळी साडेसहाच्या सुमारास जिल्हा मुख्यालयातील काली माता मंदिराबाहेर पोलिसांच्या व्हॅनमध्ये पोलिसांचे गोळ्यांनी माखलेले मृतदेह आढळून आले.

पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. पोलिसांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आज सकाळी साडेसहाच्या सुमारास रहंबल पोलिस स्टेशनला माहिती मिळाली की, सोपोरहून एसटीसी तलवाडाकडे विभागाच्या वाहनातून निघालेले दोन पोलिस गोळ्या लागून जखमी झाले आहेत. सहकाऱ्यावर गोळी झाडून आत्महत्या केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आश्वासन

# मराठवाड्यातील प्रलंबित प्रश्न सोडविणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यातील महायुती सरकारच्या शपथविधीनंतर माजी मंत्री आणि आमदार पंकजा मुंडे यांनी मराठवाड्यातील दुष्काळ, बेरोजगारी आणि स्थलांतरित कामगारांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी पंकजा मुंडे यांनी मांडलेले प्रश्न सोडवण्यासाठी विशेष लक्ष देणार असल्याचे सांगितले.



विधान परिषदेच्या आमदार पंकजा मुंडे यांनी मुंबईत देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत, मुख्यमंत्री झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. त्यानंतर एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये पंकजा मुंडे म्हणाल्या, "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन अभिनंदन केले. यावेळी त्यांच्याशी मराठवाड्यातील दुष्काळ निर्मूलन आणि बेरोजगारी यासारख्या मुद्द्यांवर चर्चा केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी महाराष्ट्रातील आर्थिकदृष्ट्या मागास भाग आणि स्थलांतरित कामगारांच्या समस्यांकडे विशेष लक्ष देणार असल्याचे आश्वासन दिले."

सहा महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे भाजपाच्या तिकिटावर बीडमधून लढल्या होत्या. मात्र, त्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या (शरद पवार) बजरंग सोनावणे यांनी पंकजा मुंडे यांचा पराभव केला होता. त्यानंतर झालेल्या विधान परिषद निवडणुकीत पंकजा यांना भाजपाने संधी दिली आणि साडेचार वर्षांनंतर त्या पुन्हा एकदा विधिमंडळात परतल्या.

### मंत्रीमंडळात स्थान मिळणार?

● विधानसभा निवडणुकीत भाजपाने सर्वाधिक जागा जिंकल्या असल्याने मंत्रिमंडळातही त्यांना जास्त जागा वाट्याला येणार आहेत. त्यामुळे भाजपाच्या अनेकांनी मंत्रिमंळात संधी मिळावी म्हणून प्रयत्न सुरू केले आहेत. अशात यापूर्वीही मंत्री राहिलेल्या पंकजा मुंडे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात स्थान मिळणार का याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहेत.



मातंग समाजाचे नेते आ .अमित गोरखे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेवून शुभेच्छा दिल्या.

## आजपासून हवामानात होणार बदल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क


**नवी दिल्ली :** देशाचे हवामान आजपासून वळण घेणार आहे. भारतीय हवामान शास्त्र विभागाने (आयएमडी) आज अनेक राज्यांमध्ये पावसाचा इशारा दिला आहे. त्यामुळे तापमानात घट नोंदवली जाऊ शकते. यामुळे कडाक्याची थंडी धडकणार आहे. आयएमडीच्या म्हणण्यानुसार, रविवारी दिल्ली-एनसीआर, पश्चिम उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा, चंदीगड, झारखंडसह उत्तर भारतातील अनेक राज्यांमध्ये पावसाची शक्यता आहे.

यामुळे थंडीत भर पडणार आहे. येत्या एक-दोन दिवसांत देशातील इतर राज्यांमध्ये थंडी वाढण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. याशिवाय हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीरमध्ये बर्फवृष्टीचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

दिल्लीत शनिवारी मोसमातील सर्वात थंड सकाळ झाली आणि किमान तापमान ७.१ अंश सेल्सिअस नोंदले गेले, अशी माहिती हवामान खात्याने दिली. मात्र, हे प्रमाण सरासरीपेक्षा तीन अंशांनी कमी आहे. तर सफदरजंग येथे २५.४ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. राजधानीत सकाळ-संध्याकाळ हलके धुके वगळता दिवसभर अंशत: ढगाळ वातावरण राहील, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे.

## नव्या विमानाचे स्वागत

पंढरी संचार छायाचित्रसेवा




**कझाकस्तान :** येथील अल्माटी विमानतळावर कझाकस्तानच्या सशस्त्र दलांसाठी खरेदी केलेले एअरबस ए-४०० एम या लष्करी वाहतूक विमानाचे असे स्वागत करण्यात आले.

# नायलॉन मांजा विक्री केल्यास कठोर कारवाई

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** नायलॉन मांजा वापरावर बंदी असतानाही उत्पादन, विक्री व वापर करत असलेल्या व्यक्तींवर कठोर कारवाई होणार आहे. नाशिक पोलीस आयुक्तांकडून घातक नायलॉन मांजा विक्री करताना आढळून आलेल्या आरोपींची यादी तयार करण्यात येत आहे. आरोपींवर आता मोक्का तसंच तडीपार अंतर्गत कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी दिले आहेत. पोलीस आयुक्तांच्या या निर्णयाचं नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे.



मकरसंक्रात सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. बाजारात ठिकठिकाणी पतंग, मांजांची दुकानं थाटली आहे. या पार्श्वभूमीवर चायनीज मांजा, नायलॉन मांजा, काचेचा चूऱ्याचे कोटिंग असलेला मांज्याची विक्रीवर पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी बंदीचे आदेश दिले आहे. नियमांचं उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

नाशिक शहरातील पंचवटी परिसरात राहणारे शुभम अहिरे आणि इमरान शहा यांच्याकडून पोलिसांनी ६५ हजार ८०० रुपये किमतीचा नायलॉन मांजाचे ९९ गट्टे जप्त केलेत. या संदर्भात पंचवटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दोघांनाही तडीपार करण्याच्या हालचाली पोलिसांनी सुरू केल्या आहेत.

## विरोधकांनी ईव्हीएमचे रडगाणे थांबवावे : एकनाथ शिंदे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या निकालात महायुती सरकारला घवघवीत यश प्राप्त झालं असून मुख्यमंत्री शपथविधी सोहळा देखील पार पडला आहे. सध्या महाराष्ट्रातील आमदारांचा शपथविधी सुरु आहे. मात्र निकाल जाहीर झाल्यापासून अजूनही विरोधकांचे ईव्हीएम मशीनवरुन आरोप-प्रत्यारोप करणं सुरुच आहे. या आरोपांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

निवडणुकीत जेव्हा महाविकास आघाडीच्या बाजूने निकाल लागतो तेव्हा ईव्हीएम मशीन चांगल्या असतात. पण जेव्हा निकाल विरोधात लागतो तेव्हा मविआच्या नेत्यांकडून ईव्हीएम घोटाळ्याची ओरड सुरु होते. विरोधी पक्षाकडे आता मुद्दा राहिलेला नाही. जनतेने विरोधकांना त्यांची जागा दाखवली आहे. महाराष्ट्रातील जनतेने विरोधकांना चारीमुंड्या चित केले आहे. त्यामुळे आता त्यांनी 'ईव्हीएमचे रडगाणे न गाता विकासाचे गाणे गायला पाहिजे', असा टोला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. त्याचबरोबर नाना पटोले २०० मतांनी जिंकले, रोहित पवार ११०० मतांनी जिंकले, मग काय म्हणायचं? कोणी काही करु शकतं का? संविधान आहे, लोकशाही आहे. जनमताचे स्वागत केले पाहिजे, असेही एकनाथ शिंदे यांनी म्हटले.

## चंद्रशेखर बावनकुळे यांची परखड टीका

# पवारांना खोटारडेपणा शोभत नाही

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** शरद पवार यांचा मी सन्मान करतो. त्यांना दीर्घ राजकीय अनुभव आहे, परंतु त्यांनी या वयामध्ये अशा प्रकारचा खोटारडेपणा करणे, जनतेला कन्फ्युज करणे अयोग्य आहे. एक प्रकारे ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाचा अपमान आहे, अशी परखड टिका भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

राज्यात झालेला त्यांनी पराभव स्वीकारलं पाहिजे, असे सांगून बावनकुळे म्हणाले, जेव्हा पराभव स्वीकारता येत नाही तेव्हा जनतेला कन्फ्युज करण्यासाठी व आपलं अपयश लपवण्याचं काम ते करत असून, जनतेने तर विधानसभामध्ये दाखवून दिले म्हणून ईव्हीएम मशीनवर दोष देऊन पुन्हा आपलं अपयश लपवण्याचे पाप पवार करत आहेत.



विधान भवन परिसरात बावनकुळे माध्यमांशी बोलताना म्हणाले, विधानसभेमधील त्यांचा अत्यंत मोठा पराभव झाला आहे. जनतेने त्यांना नाकारले म्हणून आता येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये पराभवाची भीती असल्यामुळे आपले जनमत वाचवण्याकरिता शरद पवार पुन्हा प्रयत्न करत आहेत आणि मारकडवाडीमध्ये आलेली जी लोक आहेत ती पवार यांची कार्यकर्तेमंडळी आहेत.

## अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांची दडपशाही

# कर्नाटकात महाराष्ट्रातील नेत्यांना बंदी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कर्नाटक सरकारचे हिवाळी अधिवेशन बेळगाव येथे सुरू होत आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र एकीकरण समितीने मराठी भाषिकांच्या महामेळाव्याचे आयोजन केले आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीकडून सीमा भागातील मराठी भाषिकांच्या समर्थनासाठी या मेळाव्याला यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मात्र, कर्नाटक सरकारने या महामेळाव्यावर बंदी घातली आहे. तसेच महाराष्ट्रातल्या नेत्यांना कर्नाटकात येण्यास बंदी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २००६ पासून सुरु असणाऱ्या मराठी भाषिक मेळाव्याचे यंदाही आयोजन करण्यात आले आहे. मात्र नेहमीप्रमाणे यावेळीही कर्नाटक सरकारची मराठी भाषिकांवर दडपशाही सुरु असल्याचे दिसून येत आहे. मेळाव्याच्या कालावधीतच कर्नाटक सरकारने बेळगावात विधिमंडळ अधिवेशन भरवले आहे. त्यामुळे प्रशासनाकडून कायदा-सुव्यवस्थेचे कारण पुढे करत स्थानिक प्रशासनाची मराठी भाषिकांच्या महामेळाव्याला परवानगी नाकारली आहे. तसेच महाराष्ट्रातील नेत्यांना देखील बेळगावात प्रवेशबंदी घातली आहे. 'कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रातील नेत्यांनी बेळगाव जिल्ह्यात प्रवेश करू नये, अन्यथा त्यांना महाराष्ट्राच्या सीमेवरच रोखले जाईल', असा इशारा कर्नाटक सरकारकडून देण्यात आला आहे.

### शिवसैनिकांचे सडेतोड उत्तर

● कोल्हापूरातील शिवसैनिकांनी कोणत्याही परिस्थितीत बेळगावात जाण्याचा निर्धार केला आहे. आम्हाला बेळगावमध्ये प्रवेश मिळाला नाही तर आम्हीदेखील कर्नाटकमधील नेत्यांना कोल्हापूरमध्ये अंबाबाईच्या दर्शनाला येऊ देणार नाही, अशी भूमिका या शिवसैनिकांनी घेतली आहे. त्यामुळे सोमवारी बेळगावात काय घडणार, हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे.





"मी त्याला चांगली गोलंदाजी केली असे म्हणालो, पण त्याने वेगळा अर्थ घेतला. ज्यावेळी त्याने मला पॅव्हिलियनमध्ये परतण्यासाठी इशारा केला त्यावेळी मी त्याला प्रत्युत्तर दिले. मागील दोन डावातील खेळामुळे तो थोडासा निराश झाला असेल. — ट्रॅव्हिस हेड

"सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीत खेळताना त्याच्या गुडघ्याला सूज आली होती, त्यामुळे आम्ही त्याच्या फिटनेसवर लक्ष ठेवून आहोत. या कारणामुळेच त्याच्या कसोटी सामना खेळण्याच्या तयारीत अडथळे येत आहेत. — रोहित शर्मा



# भारताची हाराकिरी

## स्टार्क-कमिन्सची भेदक गोलंदाजी अन् मालिकेतही बरोबरी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**ॲडिलेड :** बॉर्डर-गावसकर ट्रॉफी या ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेत ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघाने भारताविरुद्ध पहिल्या सामन्यातील पराभवानंतर दुसऱ्या सामन्यात दणक्यात पुनरागमन केले. ऑस्ट्रेलियाने ऍडलेडला झालेल्या दिवस-रात्र कसोटी सामन्यात अडीच दिवसातच भारताविरुद्ध १० विकेट्सने विजय मिळवला. यामुळे आता दोन सामन्यांनंतर या मालिकेत १-१ अशी बरोबरी झाली आहे. यामुळे भारतीय संघ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीप २०२३-२५ स्पर्धेच्या गुणतालिकेतही तिसऱ्या क्रमांकावर घसरला आहे. अव्वल क्रमांकावर ऑस्ट्रेलिया पोहचला आहे. दक्षिण आफ्रिका दुसऱ्या क्रमांकावर आहे.





दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताला ऑस्ट्रेलियाला १९ धावांचेच लक्ष्य देता आले होते. हे लक्ष्य ऑस्ट्रेलियाने ३.२ षटकातच पूर्ण केले. ऑस्ट्रेलियाकडून सलामीवीर नॅथन मॅकस्विनी (१०) आणि उस्मान ख्वाजा (९) नाबाद राहिले.

या सामन्यात तिसऱ्या दिवशी भारताने २५ व्या षटकापासून ५ बाद १२८ धावांपासून पुढे खेळायला सुरुवात केली. परंतु, दिवसाच्या पहिल्याच षटकात ऋषभ पंतला मिचेल स्टार्कने २८ धावांवर बाद केले. ऋषभ पंतचा झेल स्लीपमध्ये स्टीव्ह स्मिथने पकडला.

त्यानंतर नितीश कुमार रेड्डी आणि आर अश्विनने डाव पुढे नेण्याचा प्रयत्न केला. परंतु अश्विनला पॅट कमिन्सने ७ धावांवर ३० व्या षटकात बाद केले. त्याचा झेल यष्टीरक्षक ॲलेक्स कॅरेने पकडला.

यानंतर हर्षित राणाने नितीश रेड्डीला साथ देताना १२ चेंडू खेळला, पण त्याला धावा करता आल्या नाही. त्याला ३४ व्या षटकात कमिन्सने बाद केले.

पुढच्या षटकात नितीश रेड्डीलाही कमिन्सनेच नॅथन मॅकस्विनीच्या हातून झेलबाद करत ५ विकेट्स पूर्ण केल्या. नितीशने या डावातही भारताकडून सर्वाधिक ४२ धावा केल्या. अखेरीस मोहम्मद सिराजला स्कॉट बोलंडने ७ धावांवर बाद करत भारताचा डाव ३६.५ षटकात १७५ धावांवर संपवला. पहिल्या डावातील १५७ धावांच्या पिछाडीमुळे ऑस्ट्रेलियाला १९ धावांचेच लक्ष्य देता आले. बुमराह २ धावांवर नाबाद राहिला.

या सामन्यात दुसऱ्याच दिवशी भारताचे केएल राहुल (७), यशस्वी जैस्वाल (२४), विराट कोहली (११), शुभमन गिल (२८) आणि रोहित शर्मा (६) यांनी स्वस्तात विकेट्स गमावल्या होत्या.

## ऑस्ट्रेलियाच्या महिला संघाकडूनही भारताचा पराभव



- **नवी दिल्ली :** रविवारी भारतीय पुरुष संघाला ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्याच ऍडलेडमध्ये १० विकेट्सने पराभवाचा सामना करावा लागला. यानंतर लगेचच काही वेळात भारतीय महिला संघही ऑस्ट्रेलिया महिला संघाविरुद्ध ब्रिस्बेनमध्ये वनडे मालिकेतील दुसऱ्या सामन्यात १२२ धावांनी पराभूत झाला.
- यामुळे ऑस्ट्रेलिया महिला संघाने तीन सामन्यांची वनडे मालिकाही २-० अशा विजयी आघाडीसह खिशात टाकली आहे. महिला वनडे सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारतासमोर २७२ धावांचे लक्ष्य ठेवले होते. पण या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघ ४४.५ षटकात २४९ धावांवर सर्वबाद झाला.
- भारताची या लक्ष्याचा पाठलाग करताना सुरुवात खराब झाली होती. भारताने चौथ्याच षटकात स्मृती मानधनाची विकेट गमावली होती. मानधनाने ९ धावा केल्या. त्यानंतर काही वेळातच हर्लिन देवोलही १२ धावांवर बाद झाली.
- पण नंतर ऋचा घोष आणि कर्णधार हरमनप्रीत कौर यांनी डाव सावरताना अर्धशतकी भागीदारी केली होती. या दरम्यान ऋचाने अर्धशतकही पूर्ण केले होते. पण अर्धशतकानंतर ऋचाला ॲलना किंगने ५४ धावांवर क्लिन बोल्ड केले. तरी नंतर हरमनप्रीत आणि जेमिमा रोड्रिग्स यांनी डाव पुढे नेला. पण हरमनप्रीतला मेगन शटने ३८ धावांवर माघारी धाडले. काही वेळातच ३१ व्या षटकात दीप्ती शर्मा १० धावांवर बाद झाली, तर ३५ व्या षटकात जेमिमाह ४३ धावांवर बाद झाली.

## भारताला हरवत दुसऱ्यांदा बनले आशियाई चॅम्पियन





**नवी दिल्ली :** बांगलादेशच्या १९ वर्षांखालील संघाने रविवारी मोठा पराक्रम केला. बांगलादेशने १९ वर्षांखालील आशिया कप स्पर्धेत अंतिम सामन्यात रविवारी भारतीय संघाला ५९ धावांनी पराभूत केलं. यासह बांगलादेशने सलग दुसऱ्यांदा या स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. बांगलादेशने गेल्यावर्षी देखील अंतिम सामन्यात ८ वेळच्या विजेच्या भारतीय संघाला पराभूत करत १९ वर्षांखालील आशिया कप जिंकला होता.

रविवारी झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय संघासमोर बांगलादेशने १९९ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताला ३५.२ षटकात सर्वबाद १३९ धावाच करता आल्या. त्यामुळे भारतीय संघाला सलग दुसऱ्यांदा उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

## गुकेश - डिंग यांच्यात दहाव्या डावातही नीरस बरोबरी



**नवी दिल्ली :** चिनी विश्वविजेता डिंग व भारतीय आव्हानवीर गुकेश यांच्यातील विश्वअजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धेतील दहावा डावही बरोबरीत सुटला. दोन्ही खेळाडूंचे प्रत्येकी पाच गुण झाले आहेत. नवव्या डावाप्रमाणेच दहावा डावसुद्धा अगदीच नीरस झाला. सिंगापूर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत डिंगने पांढरी मोहरी घेऊन खेळताना लंडन पद्धतीने डाव चालू केला. सहाव्या डावातही हीच पद्धत त्याने वापरली होती. या डावात त्याने उंटाची एक खेळी बदलली. गुकेशने घाई न करता विचारपूर्वक उत्तर देऊन घोड्याने डिंगच्या उंटावर हल्ला केला. डिंगला डाव गुंतागुंतीचा करण्याच्या अनेक शक्यता होत्या; परंतु या लढतीत पटावरील स्थिती बरोबरीत ठेवण्याचा त्याचा कल पुन्हा एकदा दिसून आला. डिंगने वजिरावजिरी करून पटावर खूपच नीरस स्थिती आणली. त्याने गुकेशची राजासमोरची प्यादी वेडीवाकडी केली; परंतु एव्हढ्या छोट्या फायद्यावर त्याला डाव जिंकणे अवघड होते. गुकेशने पद्धतशीर रीतीने हळूहळू सर्व मोहऱ्यांची अदलाबदल करायला सुरुवात केली.

## तनीषा सलग चौथ्यांदा विजेती, तर कुशल चोपडाची हॅट्ट्रिक



**नवी दिल्ली :** राज्य अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेत पुरुष गटात चिन्मय सोमय्या (टीएसटी मुंबई) याने तर महिलांमध्ये सेनहोरा डीसूझा (मुंबई शहर) यांनी प्रथमच विजेतेपद पटकावले. नाशिकच्या तनीषा कोटेचा हिने मुलींच्या १९ वर्षाखालील गटात सलग चौथ्यांदा विजेतेपद पटकावले तर मुलांमध्ये नाशिकच्याच कुशल चोपडा याने विजेतेपदाची हॅट्ट्रिक साधली महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने व पुणे जिल्हा टेबल टेनिस संघटनेने शिवछत्रपती क्रीडा नगरीतील वेटलिफ्टिंग सभागृहात आयोजित केली होती. पुरुषांच्या अंतिम सामन्यात चौथ्या मानांकित चिन्मय सोमय्या याने ठाण्याच्या द्वितीय मानांकित दिपीत पाटील याच्यावर मात केली. अतिशय चुरशीने झालेला हा सामना त्याने ११-८,११-६,१४-१२,८-११,७-११,९-११, ११-८असा जिंकला. तो पुण्यामध्ये सन्मय परांजपे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे. चंडीगड विद्यापीठात तो व्यवसाय व्यवस्थापन या विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम शिकत आहे.

## भारताला डब्लूटीसी गुणतालिकेत मोठा धक्का

**नवी दिल्ली :** भारताविरुद्धचा दुसरा कसोटी सामना जिंकल्यानंतर ऑस्ट्रेलियन संघ गुणतालिकेत पहिल्या स्थानावर पोहोचला असून दोन स्थानांचा फायदा झाला आहे. ऑस्ट्रेलियाने एकूण १४ सामने खेळले आहेत, त्यापैकी ९ जिंकले आहेत आणि त्यांची टक्केवारी ६०.७१ आहे.

दुसरीकडे, भारतीय संघाला पराभवाचा फटका सहन करावा लागला आहे. भारतीय संघ गुणतालिकेत पहिल्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. भारतीय संघाने आतापर्यंत १६ सामने खेळले आहेत, त्यापैकी ९ जिंकले आहेत आणि ६ गमावले आहेत. भारताची टक्केवारी आता ५७.२९ टक्क्यांवर घसरली आहे.

## याशिका तेजवानीकडे पुणे संघाचे नेतृत्व

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जळगाव येथे ८ ते १२ डिसेंबर २०२४ या कालावधीत होणाऱ्या वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (विफा) आंतरजिल्हा फुटबॉल कनिष्ठ मुली स्पर्धेसाठी पुणे संघाचे नेतृत्व मिडफिल्डर याशिका तेजवानीकडे सोपविण्यात आले आहे. मिडफिल्डर इशानी कुलकर्णीची उपकर्णधारपदी निवड करण्यात आली आहे. पूना जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे (पीडीएफए) मानद सचिव प्रदीप परदेशी यांनी १५ दिवसांच्या निवडचाचणीनंतर शुक्रवारी १८ सदस्यीय संघाची घोषणा केली. पुणे संघाचा सलामीचा सामना सोमवारी (९ डिसेंबर) सांगली-लातूर संघाविरुद्ध होईल.



दरम्यान, संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी कैलास परदेशी तर व्यवस्थापकपदी चित्रा गडहिरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बाद फेरी पद्धतीने खेळल्या जाणाऱ्या स्पर्धेत महाराष्ट्रातील २४ जिल्ह्यांचे संघ सहभागी झाले आहेत.

पुणे संघ: याशिका तेजवानी (कर्णधार), इशानी कुलकर्णी, आकृती गुप्ता, उर्जा कपिल, तारिणी शेंडे, शर्वरी माने, क्षिती जोशी, इशिता देबनाथ, रिद्धिमा सारडा, नवमी शानबाग, आरणा सिंधव, तनिष्का देवरे, किया तेलंग, रिया जांगिड, इपशिता गवारी, आर्या चौधरी, वृंदा हिरपारा, गायत्री वाडकर.

मुख्य प्रशिक्षक : कैलास परदेशी. व्यवस्थापक: चित्रा गडहिरे.

## न्यूझिलंडची घरच्या मैदानावर इंग्लंडसमोर शरणागती

**नवी दिल्ली :** भारतात येऊन भारतीय संघाविरुद्ध निर्भेळ मालिका विजयाचा अविश्वसनीय विक्रम घडवणाऱ्या न्यूझीलंडच्या संघाचं नशीब पालटलं आहे. भारत दौऱ्यानंतर मायदेशी परतलेल्या न्यूझीलंड संघाचा इंग्लंडने धुव्वा उडवला आहे. वेलिंग्टन इथे सुरू असलेली दुसरी कसोटी तब्बल ३२३ धावांनी जिंकत इंग्लंडने तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे. २४ वर्षानंतर पाहुण्या संघाने भारतात निर्भेळ मालिका विजय संपादन केला होता. १२ वर्षानंतर भारताने मायदेशात मालिका गमावली. न्यूझीलंडचा संघ श्रीलंकेत कसोटी मालिका गमावून आला होता. पण भारतात येऊन त्यांनी दमदार खेळाच्या बळावर संस्मरणीय विजय साकारला. मायदेशी रवाना होताच न्यूझीलंडच्या संघाच्या कामगिरीत एकदमच घसरण झाली. पहिली कसोटी गमावल्यानंतर न्यूझीलंडचा संघ पुनरागमन करेल अशी आशा होती पण तसं काहीच घडलं नाही. इंग्लंडने हॅरी ब्रूकच्या तडाखेबंद शतकाच्या बळावर पहिल्या डावात २८० धावांची मजल मारली.



## १५ डिसेंबरला होणाऱ्या डब्लूपीएल लिलावात १२० खेळाडूंवर बोली रंगणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बंगलुरू :** इंडियन प्रिमिअर लीगच्या मेगा लिलावानंतर आता वूमेन्स प्रिमिअर लीगचीही तारीख व खेळाडूंची यादी जाहीर झाली आहे. डब्लूपीएल मधील ५ फ्रँचायझींनी ७ नोव्हेंबर रोजी संघात रिटेन केलेल्या खेळाडूंची यादी जाहीर केली होती. ५ फ्रँचायझींकडून एकूण ७१ खेळाडूंना संघात रिटेन करण्यात आले होते.





वूमेन्स प्रिमिअर लीग २०२५ चा लिलाव बेंगळूरू येथे १५ डिसेंबर १०१५ रोजी होणार आहे. लिलाव रविवारी दुपारी ३ वाजता सुरू होणार असून लिलावाचे थेट प्रक्षेपण आपल्याला स्पोर्ट १८ या टीव्ही चॅनेलवर व जीओ सिनेमा या मोबाईल ॲपवर पाहाता येईल.

यावेळी एकूण १२० खेळाडू लिलावात उतरले आहेत. ज्यामध्ये ९१ भारतीय व २९ परदेशी खेळाडूंचा समावेश आहे. भारतीय खेळाडूंमध्ये ९ कॅप्ड व ८२ अनकॅप्ड खेळाडू लिलावात पाहायला मिळतील. तर २१ कॅप्ड व ८ अनकॅप्ड परदेशी खेळाडू लिलावात उतरले आहेत.

गतविजेत्या आरसीबी ने कायम ठेवलेल्या खेळाडूंमध्ये स्मृती मानधना ( कर्णधार), एस मेघना, ऋचा घोष, एलिस पेरी, जॉर्जिया वेरेहम, श्रेयंका पाटील, आशा शोभना, सोफी डिव्हाईन, रेणुका सिंग, सोफी मोलिनक्स, एकता बिश्त, केट क्रॉस, कनिका आहुजा, डॅनी व्हॅट यांचे नाव आहे.

## एलिस पेरीची विक्रमाला गवसणी

**नवी दिल्ली :** एलिस पेरीने हे शतक झळकावताना वनडेमध्ये ४००० धावांचा टप्पा पार केला आहे. ती महिला वनडेमध्ये ४००० धावा पूर्ण करणारी ऑस्ट्रेलियाची चौथीच खेळाडू आहे. तिच्या वनडेमध्ये १४९ सामन्यांतील १२२ डावात ४०६४ धावा झाल्या आहेत. याशिवाय तिने महिला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ७००० धावा देखील पूर्ण केल्या आहेत.

त्यामुळे ती महिला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ७००० धावा पूर्ण करणारी आणि त्याचबरोबर ३०० पेक्षा अधिक विकेट्स घेणारी पहिलीच खेळाडू बनली आहे. यापूर्वी असा विक्रम कोणालाही करता आला नव्हता. तिने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आत्तापर्यंत ७०८० धावा केल्या आहेत.

## देवजित सैकिया बीसीसीआयचे बनले अंतरिम सचिव

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बीसीसीआयचे सहसचिव देवजीत सैकिया यांना बोर्डाचे अंतरिम सचिव बनवण्यात आले आहे. ते जय शहा यांची जागा घेतील, ज्यांनी १ डिसेंबर रोजी आयसीसी चेअरमन म्हणून पदभार स्वीकारला. सैकिया हे वकील असून ते आसामकडून देशांतर्गत क्रिकेट खेळले आहेत.

सैकिया हे कायमस्वरूपी सचिव बनलेले नाहीत. या पदासाठी निवडणूक होणे बाकी आहे, तथापि सैकिया सप्टेंबरपर्यंत सचिवपदी राहू शकतात.

या आठवड्यात दुबईत आयसीसीची बैठक झाली,



ज्यामध्ये सैकियांनी बीसीसीआयचे प्रतिनिधित्व केले. या बैठकीचे नेतृत्व जय शहा यांनी केले, सैकिया आता शहा यांच्याकडून बीसीसीआयमध्ये पदभार स्वीकारतील. यापूर्वी ते मंडळात सहसचिव होते. बीसीसीआय सचिव निवडीनंतर सैकिया पुन्हा संयुक्त सचिवपदाची सूत्रे हाती घेतील, असे मानले जात आहे.

## मोहम्मद सिराज आणि ट्रॅव्हीस हेडची अखेर गळाभेट!

**ॲडिलेड :** ॲडिलेड कसोटीत बाजी मारून ऑस्ट्रेलियाने सामन्यात बाजी मारली. सामना तिसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात संपुष्टात आला. पण कालचा ( दुसरा ) दिवस एका राड्यामुळे चर्चेत राहिला. सोशल मीडियावर मिम्सचे वादळ उठले आणि हेड-सिराज चर्चेच्या केंद्रास्थानी आले. ऑस्ट्रेलियाच्या डावादरम्यान सिराजला ऑस्ट्रेलियन चाहत्यांकडून डिवचले जात होते अन् सिराजने शतकवीराची दांडी उडवत ऑस्ट्रेलियन्सना उत्तर दिले. सिराजने मनात साठवलेला रोष विकेट सेलिब्रिशन मधून बाहेर आला आणि दोघांमध्ये शाब्दिक चकमक पाहायला मिळाली. पण काल पेटलेल्या या वादाच्या ठिणगीचे आज थेट गळाभेटीत रूपांतर झाले. पण हा नेमका विषय काय? कोणी सिराजला ट्रोल करतयं तर कोणी सपोर्ट... ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात केलेल्या मोठ्या खेळीमध्ये सर्वात महत्त्वपुर्ण योगदान ट्रॅव्हिस हेडने दिले. सुरूवातीला संथ व संयमी खेळी खेळणाऱ्या ट्रॅव्हिस हेडने अर्ध शतकानंतर फटकेबाजी करण्यास सुरूवात केली.

### टेनिस साखळी स्पर्धेत

## स्पिअर्स, काराज कार्डिनल्स, राफा बुल्स संघ विजयी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना यांच्या वतीने आयोजित पहिल्या पीवायसी- स्वोजस एंटरप्रायझेस टेनिस साखळी स्पर्धेत स्पिअर्स, काराज कार्डिनल्स, राफा बुल्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून विजयी सलामी दिली.

पीवायसी हिंदू जिमखाना येथील टेनिस कोर्टवर आजपासून सुरु झालेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत तन्मय चोभे, मिहिर दिवेकर, सोहिल गाला, आरिन माळी, समीहन मेहेंदळे, अनुज मेहता,



राहुल गांगल, आर्य देवधर, साकेत गोडबोले, नितीन पेंडसे, राहुल रोडे, बिपिन चोभे यांनी केलेल्या सुरेख कामगिरीच्या जोरावर स्पिअर्स संघाने बेल्फिन्स टायगर्स संघाचा ६-१ असा एकतर्फी पराभव करून शानदार सुरुवात केली. दुसऱ्या सामन्यात काराज कार्डिनल्स संघाने पायरेट्स संघाचा ४-३ असा संघर्षपूर्ण पराभव करून विजयी सुरुवात केली.

विजयी संघाकडून रोहन छाजेड, अंकुश मोघे, अमोल काणे,अधिरित गुप्ता, निनाद देशमुख, मधुरा टेंभे, ध्रुव देशपांडे, निखिल चितळे यांनी अफलातून कामगिरी केली.

अन्य लढतीत राफा बुल्स संघाने ब्लॅक हॉक्स संघावर ४-३ असा विजय मिळवला. राफा बुल्स संघाकडून सारंग देवी, करण बापट, अजिंक्य मुठे, क्षितिज कोतवाल, वैजयंती मराठे, अयान जमेनीस, शर्वरी कटक्कर, अमीर आजगावकर यांनी सुरेख कामगिरी केली.

स्पर्धेचे उदघाटन पीवायसी हिंदू जिमखानाचे अध्यक्ष कुमार ताम्हाणे, मानद सचिव दिपक गाडगीळ, सहसचिव सारंग लागू आणि स्वोजस एंटरप्रायझेसच्या रिया शहा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी क्लबचे खजिनदार चंद्रशेखर नानिवडेकर, टेनिस विभागाचे सचिव अभिषेक ताम्हाणे, स्पर्धा संचालक नंदन डोंगरे , तन्मय आगाशे, सिद्धार्थ भावे, आमोद प्रधान, शिरीष साठे, अविनाश रानडे, ज्योती गोडबोले आदी मान्यवर उपस्थित होते.

## १२व्या वसई विरार महानगरपालिका मॅरेथॉनमध्ये विक्रमांची नोंद; रोहित वर्मा आणि सोनिका विजेते

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** १२वी वसई विरार महानगरपालिका मॅरेथॉन (व्हीव्हीएमसीएम) स्पर्धा पार पडली. व्हीव्हीएमसीएम पूर्ण मॅरेथॉन स्पर्धेत यंदा साताऱ्याचा कालिदास हिरवेने पहिल्या क्रमांकाचा मानकरी ठरला. त्याने मॅरेथॉन पुर्ण करताना २ तास १८ मिनिटे आणि १९ सेकंद अशी वेळ नोंदवली. दीपसिंग चौधरी (२:१८:२४ सेकंद) उपविजेता ठरला. तर दोन वेळा विजेता, दोन वेळचा उपविजेता मोहित राठोडला (२:१९.०६ सेकंद) तिसऱ्या स्थानावर समाधान मानावे लागले. अर्ध मॅरॅथॉनमध्ये पुरुष गटात रोहित वर्मा व महिला गटात सोनिका विजेते ठरले.



वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी अवघ्या पाच सेकंदांनी हुकलेला हिरवे म्हणाला की, "व्हीव्हीएमसीएममध्ये सहभागी होण्याबाबत मी अनिश्चित होते. वसईतील एका मित्रासोबत ४२ किमी अंतराचे प्रशिक्षण घेण्याचे मी ठरवले होते. मात्र, शेवटच्या क्षणी मी माझा विचार बदलला आणि स्पर्धात्मकपणे धावण्याचा निर्णय घेतला." कालिदास याला विजेत्यासाठीचे बक्षीस म्हणून तीन लाख रुपये मिळाले.

प्रत्यक्ष मॅरॅथॉनमध्ये ४० किलोमीटरपर्यंत अव्वल तिघे धावपटू एकमेकांपासून केवळ श्वास घेण्याच्या अंतरावर होते. त्यानंतर तिसऱ्या जेतेपदासाठी उत्सुक असलेल्या राठोडने थोडा वेग वाढवला.